साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड
रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२(६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०५.११.२०२६ | अंक नं. १८४ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चाहूल लागता थंडीची... आठवते दुकान जरीवालाची
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

शिंगवी ज्वेलर्स प्रा.लि.
या दिवाळीत प्रियजनांसाठी
सोने व चांदीच्या अलंकारांची खरेदी करा,
आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा हमखास भेटवस्तू!
68 GOLDEN YEARS
ROOP
सिटी शोरूम : जुना कापड बाजार, अ.नगर
सावेडी शोरूम : प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर

mahindra TRUCK AND BUS
दिपावली पाडवा निमित्त आकर्षक डिस्काऊंट ऑफर
mahindra FURIO
TRUCK BADLO, TAQDEER BADLEGI
JYADA MILEAGE NAHIN TO TRUCK WAPAS*
GET BACK ON THE ROAD IN 48 HOUR OR GET ₹1,000 A DAY.*
GET A 36-HOUR GUARANTEED TURNROUND AT WORKSHOP OR GET ₹3,000 PER DAY.*
NOW WITH AIR-CONDITIONED CABIN
* For Details of this guarantee, please refer to www.mahindratrukandbus.com
mahindra
Authorised Dealer-
Mahindra & Mahindra Ltd.
Truck & Bus Division.
पाटील मोटर्स
पत्ता : पी-१२५, निंबळक रोड, रेणुका माता मंदिरासमोर, एमआयडीसी, अहिल्यानगर.
7028871009 I 7972869009 I 8956743189 & 0241-2778996,
Email : patilmotors.b@gmail.com

34 YEARS ANNIVERSARY TRUST SINCE 1992
Shivam TVS
TVS
TRUST MEANS SHIVAM TVS NO.1 Dealer In Ahilyanagar
सर्वात कमी किंमतीची हमी, सर्वोत्तम सेवा आणि 34 वर्षांचा विश्वास!
म्हणूनच शिवम TVS आहे नगरकरांची 'नंबर 1' चॉईस.
FREE
TVS Radeon COMMUTER BIKE OF THE YEAR
₹10,000 किमतीची वॉशिंग मशीन फ्री!
मिळवा बुकिंगवर ₹4200 किंमतीची भेटवस्तू!
निवडक विजेत्यांसाठी OTG Oven! FREE
*T & C Apply
5%* कॅशबॅक
₹25000/-* पर्यंत डिस्काउंट
₹4,200/- चे प्रीमियम गिफ्ट हॅम्पर
₹6,500/-* पर्यंत एक्स्चेंज बोनस
NO COST EMI सुविधा उपलब्ध
ZERO DOWN PAYMENT
पैठणी साडी FREE
Flipkart OFFERS AVAILABLE | CSD FACILITY AVAILABLE
माऊली संकुल समोर,
सावेडी, अहिल्यानगर.
91300 30003
77966 85500
TVS Jupiter 113
TVS Jupiter 125
TVS Radeon COMMUTER BIKE OF THE YEAR
TVS RAIDER

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने १२(६+६) किंमत ३ रुपये अहिल्यानगर, गुरुवार दि. ०५.११.२०२६ अंक नं. १८४ वर्ष ६९ वे दैनिक वर्ष ६३ वे ANR/022/2018-2020

नगर रोलिंग शटर

*जुने शटर रिपेरिंग * गेअर शटर रिपेरिंग

*नवीन शटर मिळेल

(रमेश ढवळे) 7350682390 पत्ता - नगर-अमरधाम, नालेगाव, लोंढे मळा, अहिल्यानगर

रजपाल खरेदी करा आणि जिंका 41 दिवस 11 लाखांची बक्षिसे 11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर

₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...

विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा

रजपाल

संगमनेर 02425-222226 | अ.नगर 0241-2999299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552780



15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER

Career Ki Sharwat DISHA ke saath

दिल्ली गेट शाखा 9371051769 | पुणे बस स्टँड शाखा 9371151769 | पाईपलाईन शाखा 7447761769

Get Any Course Just in 2700/-

MS-OFFICE, ADV. EXCEL, Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.

An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE

7875777001

शिंगवी ज्वेलर्स | मुद्रा फॉर्मिंग ज्वेलरी (१ ग्रॅम ज्वेलरी)

सोने । चांदी । रत्ने


ना गिफ्टची लालच, ना लकी ड्रॉची भुरळ!

६.९% मजुरी

धनत्रयोदशीच्या हार्दिक शुभेच्छा!

धन, आरोग्य आणि सौख्य लाभो हीच सदिच्छा!

सर्जेपुरा, हत्ती चौक, अहिल्यानगर



नियम व अटी लागू

TVS



यंदाच्या दिवाळीला घरी घेवून या

डबल आनंद गाडीवर सायकल चक्कफ्री

ऑफर 10 नोव्हेंबर 2026 पर्यंत

सदर ऑफर टिव्हिएस अपाचे, रेडऑन, रायडर व स्पोर्टस् खरेदीवर लागू.

TVS गाडी खरेदीवर ₹13000/- किंमतीची सायकल फ्री मिळवा



On Road Price	1,30,358/-
Cycle Price + TVS Credit Dis. (13000+3000)	16,000/-
Effective Price	1,14,358/-



On Road Price	84,338/-
Cycle Price + TVS Credit Dis. (13000+6500)	19,500/-
Effective Price	64,838/-



On Road Price	91,893/-
Cycle Price + TVS Credit Dis. (13000+6500)	19,500/-
Effective Price	72,393/-



On Road Price	1,05,113/-
Cycle Price + TVS Credit Dis. (13000+3000)	16,000/-
Effective Price	89,113/-

TVSCREDIT ₹6500/- विशेष डिस्काऊंट ऑफर रेडऑन व स्पोर्टस् खरेदीवर लागू.

TVSCREDIT ₹3000/- विशेष डिस्काऊंट ऑफर कोणत्याही गाडी खरेदीवर लागू.

कमी डाऊनपेमेंट ₹4,999/- कमी व्याजदर 6.99% ऑफर स्पोर्टस् आणि रेडऑनवर लागू. IDFC FIRST Bank, SHRIRAMCity, AU

प्रत्येक बुकिंगवर आकर्षक भेटवस्तु

कमी डाऊनपेमेंट ₹7,999/- कमी व्याजदर 6.99% ऑफर अपाचे व रोनिनवर लागू.

L&T Financial Services फायनान्स अंतर्गत 100% पर्यंत कर्जसुविधा उपलब्ध

Jupiter कमी डाऊनपेमेंट ₹4,999/- NO COST EMI सुविधा उपलब्ध

Flipkart Offers Available CSD Facility Available

कमी डाऊनपेमेंट ₹6,999/- कमी व्याजदर 6.99% ऑफर टिव्हिएस रायडर खरेदीवर लागू. IDFC FIRST Bank, SHRIRAMCity, AU

Conditions Apply*

सेवा तत्परतेची, परंपरा विश्वसनीयतेची..

भनसाळी TVS

सक्कर चौक, अहिल्यानगर 7057817817 / 8087917817 | बेलापूर रोड, श्रीरामपूर 9763817817 / 9067817817

अधिकृत सबडिलर * गजराज ऑटो, लोणी मोबा. : ७०२०६६३५७४ * श्री साईराज ऑटो, कोल्हार मोबा. : ९९६०५९८९५९ * राका मोटर्स, राहुरी मोबा. : ८०८७२०१००७ * विरा टिव्हिएस, देवळालीप्रवरा मोबा. : ९६६५८६७०६७ * गणराज ऑटो, राहुरी फॅक्टरी मोबा. : ७४९८१५८८७० * तुवर मोटर्स, मांजरी मोबा. : ९६२३४३४६३० * जगताप ऑटो, नेवासा मोबा. : ७५१७८८६०७८ * श्री ऑटो, सोनई मोबा. : ९८५०१४९००७ * श्री स्वामी समर्थ सर्व्हिस, वांबोरी मोबा. : ९४२०६३१९१९ * ढोले मोटर्स, तिसगांव मोबा. : ७५०१०१६००६ * संदेप ऑटो, सुपा मोबा. : ७०२०९५३६०५ * सावळेश्वर ऑटो, जामखेड मोबा. : ८६००८१३६३६ * श्रुती टिव्हिएस, पारनेर मोबा. : ९९६०९२०८९८ * शिवराजे टिव्हिएस, राहुरी मोबा. : ८१४९९८८७८४ * महाकाल टिव्हिएस, भोकर मोबा. : ९०२५५१२०२५ * शुभम ऑटो, पाथर्डी मोबा. : ९७६३२७३२२८ * जगदंबा ऑटोमोबाईल्स, कुकाणा मोबा. : ७०५७२५२१९४ * जय भवानी टिव्हिएस, कुकाणा मोबा. : ७५२२९९९२९६ * वैष्णवी ऑटो, टाकळीभान मोबा. : ९१४६८९७८१७

OLA

ग्राहकांच्या पसंतीची "OLA" डिलरशिप आता अहिल्यानगर मध्ये

विख्यात OLA वाहनांची सर्व रेंज उपलब्ध

OLA S1 Pro & Pro+



Smart Features

Proximity Unlock | Cruise Control | Vacation Mode | Advanced Regen | Built-in Speakers with Concert Mode

शुभयान ऑटो प्रा. लि.

माणिकनगर शिल्पागार्डन समोर, अहिल्यानगर. संपर्क: 90214 27330

श्रीरामपुर -संपर्क: 70208 51564, नेवासा - संपर्क: 97661 94709,

जामखेड - संपर्क: 77967 80386, दौंड - संपर्क: 84828 68958

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

लोककलावंतांची दिवाळी अंधारातच : शासनाचा निषेध

नगर – शासन एकीकडे विविध कला महोत्सावर कोट्यावधी रूपये खर्च करत आहे, परंतु लोककलावंतांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. दुष्काळी परिस्थितीमुळे लोककलावंतांच्या समस्यांकडे लक्ष दिले जाईल असे आश्वासन सांस्कृतिक विभागाच्या मंत्र्यांनी दिले होते पण त्यांना या आश्वसानाकडे लक्ष द्यायलाच वेळ नसल्याची खंत परशुराम हिंदू सेवा संघ लोककला विभागाचे समन्वयक बाळासाहेब मालुसकर व शिवाजी शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

एकीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असताना आता लोककलावंतांवरही उपासमारीची वेळ आली आहे. शासन व सांस्कृतिक मंत्रायल आता लोककलावंतांच्या आत्महत्येची वाट पाहत आहे का असा सवाल करत मालुसकर व शिंदे यांनी शासनाचा निषेध केला आहे.

जिल्हा सहकारी बँकेचे नवे कारभारी दिवाळीनंतरच ठरणार

अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे लक्ष

नगर – जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक नुकतीच पार पडली असून आता अध्यक्ष–उपाध्यक्ष पदाच्या निवडीला वेग येणार आहे. निवडणुकीनंतर पंधरा दिवसांच्या आत ही निवड करणे बंधनकारक असल्याने आता दिवाळीनंतरच बँकेला नवे कारभारी मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे. बँकेच्या निवडणुकीनंतर विखे–थोरात–गडाख गटाकडे २१ पैकी १८ संचालक असल्याने सहकार विकास पॅनलचा अध्यक्ष–उपाध्यक्ष होणार हे उघड आहे. पण कुणाला संधी मिळणार याची आता सर्वांना उत्सुकता आहे. डॉ. सुजय विखे, शंकरराव गडाख, आ. मोनिका राजळे, रणजितसिंह देशमुख, बिपीन कोल्हे यांची नावे चर्चेत असून महिलांना संधी देण्याचे ठरल्यास आ. राजळे यांच्यासोबतच संजीवनी शिंदे, राजश्री घुले, अनुराधा नागवडे यांचीही नावे पुढे येऊ शकतात.



जिल्हा बँकेसाठी ११ जागा बिनविरोध झाल्या होत्या. त्यातील १० जागा विखे–थोरात–गडाख गटाच्या, तर एक विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे गटाची होती. ज्या दहा जागांसाठी निवडणूक झाली. त्यात सात जागा विखे–थोरात–गडाख गटाला, एक जागा लंके–लोखंडे गटाला तर, एक जागा अपक्षाला मिळाली होती. अकोल्यातून अपक्ष म्हणून निवडून आलेल्या संजीवनी शिंदे ह्या बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांच्या कन्या असून गायकर यांनी लगेच विखे–थोरात गटात सामील होण्याचा निर्णय घेतल्याने विखे–थोरात–गडाख गटाच्या एकूण १८ जागा झाल्या आहेत. विरोध पॅनलमधून खा. नीलेश लंके यांनी एकमेव पारनेरची जागा जिंकली आहे. राम शिंदे यांची एक जागा बिनविरोध झाली होती, तर कर्जतची जागा त्यांच्या पॅनलने जिंकली.

बँकेची निवडणूक बिनविरोध करताना खा. लंके यांना पारनेरची जागा सोडायची नाही, असा ठाम निर्धार विखे गटाने केला होता. त्यामुळे तेथे निवडणूक झाली पण त्यात लंके यांनी मोठ्या मतांनी बाजी मारली. राम शिंदे यांनाही बिनविरोध निवडीच्या प्रक्रियेत विखे–थोरात गटाने महत्व दिलेले दिसले नाही. त्यामुळे त्यांनी चार उमेदवार दिले होते. त्यातील एक जण बिनविरोध झाला, तर एक जागा निवडून आली. जनरलच्या दोन जागांवरील उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले नव्हते पण त्यांनी ऐनवेळी आपण रिंगणात नसल्याचे जाहीर केल्याने त्यांना अल्प मते मिळाली. बिनविरोधच्या प्रक्रियेत विश्वासात न घेतल्याची सल असल्याने शिंदे विरोधात राहतात की विखे–थोरात गटाबरोबर जुळवून घेतात हे अद्याप निश्चित नाही. शिंदे यांचे समर्थक वेट ॲण्ड वॉचच्या भुमिकेत आहेत.

अध्यक्ष कोणत्या गटाचा होणार याची उत्सुकता

विखे–थोरात गटाच्या २१ पैकी एकूण १८ जागा निवडून आल्याने अध्यक्ष व उपाध्यक्ष याच गटाचा होणार हे उघड आहे. पण यात परत तो विखे की थोरात गटाचा याची खरी कसोटी लागणार आहे. डॉ. सुजय विखे यांनी निवडणुकीनंतर हा निर्णय मुख्यमंत्री घेणार असल्याचे सूतोवाच केले होते. या दोन्ही गटांचा विचार करता थोरात गटाचे बारापेक्षा अधिक संचालक आहेत. तर विखे यांच्याकडील गोळाबेरीज सहाच्या पुढे जात नाही. ऐनवेळी लंके हे पण विखे विरोधातून थोरात यांच्या पारड्यात वजन टाकू शकतात. राम शिंदे यांनी आपले पत्ते उघड केले नसले तरी जिल्ह्याच्या राजकारणात विखे यांच्याशी त्यांचे फारसे सख्य नसल्याने अध्यक्षपद विखे गटाकडे जाण्याची शक्यता कमीच वाटत आहे. थोरात गटाकडून अध्यक्षपदासाठी कुणाला संधी दिली जावू शकते याची उत्सुकता आहे.तर, उपाध्यक्षपद विखे गटाला भेटू शकते.

विखे, गडाख, राजळे, देशमुख, कोल्हे चर्चेत

बँकेच्या निवडणुकीची सर्व सुत्रे डॉ. सुजय विखे यांनी आपल्या हातात ठेवल्याचे चित्र दिसत असल्याने ते अध्यक्षपदाच्या स्पर्धेत आहेत हे उघड पण त्यांच्याकडे म्हणजेच विखे गटाकडे तितकेसे संख्याबळ नाही. दुसरीकडे बँकेत अध्यक्ष भाजपाचाच करायचा असा चंग विखे यांनी बांधला तर थोरात गटातील आ. मोनिका राजळे, बिपीन कोल्हे यांची नावे अग्रभागी राहतील. कारण हे दोघे भाजपात असले तरी ते जिल्ह्याच्या राजकारणात थोरात गटाचे मानले जातात. थोरात गटाचाच अध्यक्ष करायचा ठरल्यास मग त्यांचे जावाई रणजितसिंह देशमुख व माजीमंत्री शंकरराव गडाख यांनाही संधी मिळू शकते. महिलांचा विचार झाल्यास आ. राजळे यांचे नाव अध्यक्षपदासाठी आघाडीवर राहिल, तर उपाध्यक्षपदासाठी संजीवनी शिंदे यांना विखे गटाकडून संधी मिळू शकते.

असे आहे पक्षीय बलाबल

भाजपा : डॉ. सुजय विखे, आ. मोनिका राजळे, आ. अक्षय कर्डिले, आ. प्राजक्त तनपुरे, वैभव पिचड, बिपीन कोल्हे, सचिन घुमरे, ज्योती शिंदे (८), राष्ट्रवादी अजित पवार गट : आ. आशुतोष काळे, सचिन जगताप, दत्तात्रय पानसरे, संजीवनी शिंदे, अनुराधा नागवडे, राजश्री घुले (६), इंदिरा काँग्रेस : रणजितसिंह देशमुख, गणपतराव सांगळे, करण ससाणे, संगीता वाघ (४), शिवसेना ठाकरे गट–शेतकरी क्रांतीकारी पक्ष : शंकरराव गडाख, कारभारी जावळे (२), राष्ट्रवादी शरद पवार गट : खा. नीलेश लंके (१). पक्षीय बलाबल असे असले तरी जिल्हा बँकेच्या राजकारणात यापूर्वी काही अपवाद वगळता थोरात विरुध्द विखे असेच चित्र असायचे. परंतु यावेळेस या दोन्ही गटांनी जुळवून घेतल्याने विरोधी गटात आता केवळ तीनच संचालक आहेत. पण अध्यक्ष पदाच्या निवडीत ही पारंपारिक गटबाजी उफळून आल्यास जिल्हा बँकेत थोरात गटाचे पारडे जड राहणार आहे हे उघड आहे. त्यामुळेच थोरात गटाचा अध्यक्ष होणार असला तरी तो भाजपा पक्षात असलेला व्हावा याकडे विखे गटाचे धोरण आहे. त्यामुळेच डॉ. सुजय विखे यांनी निवडणुकीनंतर अध्यक्षपदाचा निर्णय मुख्यमंत्रीच घेतील असे जाहीर केले आहे, तर निवडणूक काळातही भाजपाच्या एका आमदाराने बँकेचा अध्यक्ष भाजपाचाच असेल असा दावा केला होता.

राज्यस्तरीय हिंदी निबंध स्पर्धेत पाअुलबुधे महाविद्यालयाचे यश

नगर – महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने आयोजित पश्चिम भारत हिंदी राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहिल्यानगर येथील विद्यार्थिनींनी यश संपादन केले.


मनाली पवार


शुभांगी जाधव

या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मनाली संजय पवार हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर शुभांगी दत्तात्रेय जाधव हिने चतुर्थ क्रमांक मिळवला.

या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. हिंदी भाषेतील अभिव्यक्ती कौशल्य, विचारांची मांडणी, भाषेवरील प्रभुत्व आणि लेखनातील सर्जनशीलता या गुणांचा कस या स्पर्धेत लागला. त्यामध्ये मनाली संजय पवार हिने आपल्या प्रभावी लेखनाच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळविला. तर शुभांगी दत्तात्रेय जाधव हिने चौथा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनयनाथ पाअुलबुधे, संस्थेचे संचालक साई पाअुलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, तज्ज्ञ संचालक डॉ. रेखा राणी खुराणा, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा डावरे, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे, डी. एड. महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. सविता सानप, डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्य डॉ. प्राची मचे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सोनालीताई दुडगू यांचे दु:खद निधन



नगर – लिंक रोड, स्वप्नपूर्ती अपार्टमेंट, केडगाव येथील रहिवासी सोनालीताई प्रदीप दुडगू (वय ३९) यांचे ५ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

'वरिष्ठ राज्यस्तरीय तलवारबाजी'साठी ६ नोव्हेंबरला अहिल्यानगर जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा

नगर – ३७ वी वरिष्ठ राज्यस्तरीय पुरुष व महिला तलवारबाजी स्पर्धा १३ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत रायगड (नवी मुंबई) येथे आयोजित करण्यात आली आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अधिकृत संघाच्या निवड प्रक्रियेसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही अजिंक्यपद स्पर्धा ६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे पार पडणार आहे.

स्पर्धक व खेळाडूंसाठी महत्त्वाच्या सूचना : इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर : अजिंक्यपद स्पर्धा पूर्णपणे अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक ऑपरेटर्स (Electronic Equipment) वर घेतली जाणार आहे.

क्रीडा साहित्य : स्पर्धेसाठी येणाऱ्या प्रत्येक खेळाडूने आपले स्वतःचे तलवारबाजीचे साहित्य (Fencing Equipment/Kit) सोबत आणणे अनिवार्य आहे.

सहभाग : अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व इच्छुक पुरुष व महिला तलवारबाजांनी (Fencing Players) वेळेवर उपस्थित राहून या निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

माहिती व संपर्कासाठी : स्पर्धेसंदर्भात माहिती किंवा नाव नोंदणीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा : संदेश भागवत (सचिव – अहिल्यानगर जिल्हा फेन्सिंग संघटना) मो. ९४२२२२९२८१

संजय कोठूळे यांचे अपघाती निधन



नगर – खडकी येथील रहिवासी संजय आप्पासाहेब कोठूळे (वय ४२) यांचे ४ नोव्हेंबर रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे ५ नोव्हेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. संदीप कोठूळे यांचे ते बंधू होत.

हभप यादवराव खेडकर यांचे निधन

नगर – येथील भुतकरवाडीतील रहिवासी यादवराव खेडकर (वय ९३) यांचे निधन झाले. त्यांच्यामागे गणपत, दत्तात्रय, विनायक ही ३ मुले, नातवंडे, पणतू होत. यादवराव प्रथम हातमाग, पवारलूम चालवायचे नंतर त्यांनी लालटाकी येथे जय लक्ष्मी टी सेंटर सुरू केले.



१९९० मध्ये हरिहर महाराजांनी त्यांना अनुग्रह दिला तेव्हापासून त्यांनी दरवर्षी पंढरपूर, पैठण व आळंदी पायी वारी ३० वर्षे केली तसेच ते दिंडी पूर्वी सेवेकरी म्हणून आठ दिवस पडेल ते काम करत असेल, लालटाकी व भुतकरवाडी परिसरात ते सर्व परिचित होते.

मंगलबाई गांधी यांचे संथाराव्रतात निधन


नगर – महावीर बंगला, एकता कॉलनी, आगरकर मळा स्टेशन रोड येथील रहिवासी मंगलबाई प्रकाश गांधी (आढळगाववाला) (वय ७२) यांचे संथाराव्रतात ४ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, १ मुलगी, २ दीर, नातवंडे असा परिवार आहे. प्रकाश गांधी यांच्या पत्नी, पूनम बोरा यांच्या मातोश्री, ईश्वर, धनराज गांधी यांच्या भावजय, सिद्धी बोरा यांच्या आजी तर निलेश भंडारी यांच्या मामी होत.

सुरेश देसाई यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सांडवे येथील रहिवासी, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सुरेश विठोबा (विठ्ठल) देसाई (वय ७०) यांचे ५ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सांडवा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, ३ बहिणी, १ भाऊ असा परिवार आहे. संतोष व नारायण देसाई यांचे ते वडील तर लक्ष्मण देसाई यांचे बंधू होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



मातृत्व, कृतज्ञता आणि संपन्नतेचे प्रतीक असलेल्या वसुबारसच्या दिवशी आपल्या वासराला मायेने जवळ घेऊन गौमातेने मायेची ऊब दिली. तपोवन रोडवरील गोशाळा येथील दृश्य. (छाया – विजय मते)

विश्व हिंदू परिषदेच्या वतीने वसुबारसनिमित्त गोमाता पूजन

नगर – वसुबारस या सणाचे औचित्य साधून विश्व हिंदू परिषदेच्या वतीने आगरकर मळ्यात महात्मा फुले प्रखंड, गाडळकर निवास येथे गोमाता पूजनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आला होता. यावेळी गोमातेचे विधिवत पूजन करून आरती करण्यात आली.



विश्व हिंदू परिषदेच्या वतीने वसुबारसनिमित्त आगरकर मळ्यात महात्मा फुले प्रखंड, गाडळकर निवास येथे आयोजित गोमाता पूजनप्रसंगी उपस्थित. (छायाचित्र – उदय जोशी)

हिंदू संस्कृतीमध्ये गोमातेला अनन्यसाधारण महत्त्व असून, गोमातेचे पूजन ही भारतीय संस्कृती आणि परंपरेची ओळख आहे. वसुबारस हा सण गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणून साजरा केला जातो. या परंपरेचे महत्त्व जपण्याच्या उद्देशाने विश्व हिंदू परिषदेच्या वतीने गोमाता पूजन करण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे अहिल्यानगर विभागमंत्री सुनील खिस्ती, जिल्हा सहमंत्री शरद नगरकर, सहमंत्री राजेंद्र चुंबळकर, प्रखंडमंत्री वीरेंद्र शिंदे, नगरसेविका गीतांजली काळे, नगरसेविका सुवर्णा गव्हाणे, सुहास मुळे, स्नेहा जोशी, बोरुडे, आशिष गाडळकर, विकास डोलारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.

गोशाळांतील पशुधनाच्या चारा–पाण्यासाठी प्रतिदिन १०० रुपयांचे अनुदान देण्यात यावे

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गोशाळा महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

नगर – राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे गोशाळांमधील पशुधनाच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला असून, शासनाने प्रत्येक पशुसाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान तातडीने मंजूर करावे, अशी मागणी गोशाळा महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्ह्यातील गोशाळा संचालक आणि पशुपालकांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. राज्यातील शासनाकडे नोंदणीकृत असलेल्या १ हजार १४ गोशाळांमधील सर्व पशुधनासाठी चारा व पाण्याच्या व्यवस्थेकरिता सरसकट अनुदान देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.



गोशाळांतील पशुधनाच्या चारा–पाण्यासाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान देण्याच्या मागणीचे निवेदन गोशाळा महासंघाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.

राज्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने ग्रामीण भागातील पशुधनासमोर चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतांमध्ये हिरवा चारा, कडबा आणि कुटार उपलब्ध होत नसून पडीत जमिनी, डोंगराळ भाग तसेच जंगल परिसरातही अपेक्षित चारा उगवलेला नाही. परिणामी उपलब्ध चाऱ्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. दुसरीकडे शासनाकडेही पशुधनासाठी पुरेसा चारा साठा उपलब्ध नसल्याने आगामी काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. केवळ चाऱ्याचाच नव्हे, तर पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न बिकट होत आहे. विहिरी, बोअरवेल, तलाव आणि धरणांमधील पाणीसाठा कमी होत असल्याने भविष्यात गोशाळांना टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे चारा आणि पाण्याचे नियोजन आतापासूनच करणे आवश्यक असल्याचे महासंघाने निवेदनात नमूद केले आहे.

गोशाळांवर क्षमतेपेक्षा अधिक पशुधनाचा भार

दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांना स्वतःचा उदरनिर्वाह करणेही कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आपल्याकडील पशुधन गोशाळांमध्ये आणून देत आहेत. गोशाळा संचालकही सामाजिक बांधिलकीतून या पशुधनाचा स्वीकार करीत आहेत. मात्र, त्यामुळे अनेक गोशाळांमध्ये त्यांच्या निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक गोवंश जमा झाला आहे. उपलब्ध मनुष्यबळ, आर्थिक साधने आणि चारा–पाण्याच्या मर्यादित व्यवस्थेत एवढ्या मोठ्या पशुधनाचे संगोपन करणे गोशाळा संचालकांसाठी आव्हानात्मक बनले आहे. त्यामुळे शासनाने प्रत्येक गोशाळेतील पशुधनाची प्रत्यक्ष संख्या विचारात घेऊन अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

गोवंश कत्तलीकडे जाण्याची भीती; चारा डेपो उभारण्याची मागणी

दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेले काही शेतकरी नाइलाजाने आपल्याकडील पशुधन विक्री करीत आहेत. अशा पशुधनाची खरेदी करणारे शेतकरी नसल्याने मोठ्या प्रमाणात गोवंश कत्तलीसाठी जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्रात गोवंश हत्याबंदीचा कायदा लागू असून शासनाने गोमातेला राज्य मातेचा दर्जाही दिला आहे. अशा परिस्थितीत गोवंशाचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. कत्तलीसाठी जाणाऱ्या गोवंशाची वाहतूक गोरक्षकांनी पकडल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गोवंशाचे संरक्षण करण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, असेही निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय ग्रामीण भागातील पशुपालकांना दिलासा देण्यासाठी प्रत्येक गावात ग्रामपंचायत स्तरावर चारा डेपो सुरू करावेत. चाऱ्याची उपलब्धता, साठवणूक आणि वितरण यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी. तसेच गोशाळांमधील पशुधनाच्या संख्येनुसार प्रतिदिन प्रतिपशू १०० रुपये याप्रमाणे चारा व पाण्यासाठी अनुदान तातडीने जाहीर करून त्याचे सरसकट वितरण करावे, अशी मागणी महासंघाने केली आहे.

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत हे निवेदन पोहोचवून आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे आवाहन गोशाळा महासंघाने केले आहे.

या वेळी गोशाळा महासंघाचे अध्यक्ष ललित चोरडिया, सचिव गौतम कराळे, उपाध्यक्ष ह.भ.प. रवींद्रनाथ महाराज, सुद्रिक मंगेश भापकर, हिंदुराष्ट्र सेनेचे जिल्हाध्यक्ष संजय अडोळे, अनिल जोशी, प्रमिताताई ढगे, नामदेव कराळे, मुनोत आदी उपस्थित होते.



सविता रमेश फिरोदिया प्रशालेचा सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करत चार स्वयंसेवी संस्थांना दिवाळी भेटीचे वाटप केले.

समाजातील गरजू व्यक्तिंच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदतीचा हात देणे ही आपली सामूहिक जबाबदारी

दिलीप गुंदेचा यांचे प्रतिपादन; सविता रमेश फिरोदिया प्रशालेचा सामाजिक बांधिलकीचा आदर्श; चार स्वयंसेवी संस्थांना दिवाळी भेटीचे वाटप

नगर – दिवाळी हा आनंद, उत्साह, मांगल्य आणि आपुलकीचा सण आहे. या सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकाला घेता यावा, विशेषतः गरजू, वंचित आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून आधार मिळणाऱ्या व्यक्तींची दिवाळीही आनंददायी व्हावी, या सामाजिक जाणिवेतून सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या वतीने दिवाळी भेट उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शहर व परिसरातील चार स्वयंसेवी संस्थांना किराणा साहित्य, दिवाळी फराळ आणि विविध जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याची परंपरा कायम ठेवत प्रशालेने राबविलेल्या या उपक्रमातून सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श निर्माण केला आहे.

या उपक्रमांतर्गत अरणगाव येथील मानव सेवा प्रकल्प, केडगाव येथील सावली प्रकल्प, मोहोज खुर्द येथील मानव सेवा प्रतिष्ठान आणि तपोवन रोड येथील बालघर प्रकल्प या चार संस्थांना दिवाळीनिमित्त मदतीचे साहित्य देण्यात आले. या संस्थांच्या माध्यमातून विविध गरजू घटकांसाठी सामाजिक कार्य केले जाते. अशा संस्थांना सणासुदीच्या काळात आवश्यक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्यावरील काही प्रमाणातील आर्थिक भार हलका होण्यास मदत होते. दिवाळीच्या काळात प्रत्येक घरात आनंदाचे वातावरण असते; मात्र समाजातील काही घटकांना आर्थिक व अन्य अडचणींमुळे सणाचा आनंद अपेक्षित स्वरूपात घेता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन प्रशालेच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पुस्तकी ज्ञानाबरोबरच सामाजिक जबाबदारी

संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षणसंस्था ही केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी संस्था नसून समाजाच्या जडणघडणीतही तिची महत्त्वाची भूमिका असते. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच सामाजिक जबाबदारी, माणुसकी, सहकार्य आणि सेवाभाव यांचे संस्कार मिळणे आवश्यक आहे. समाजातील गरजू व्यक्तींच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदतीचा हात देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. दिवाळीसारख्या आनंदाच्या सणात समाजातील प्रत्येक घटक सहभागी व्हावा, या भावनेतून प्रशालेच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांमध्ये आपुलकी आणि परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत होते, असेही त्यांनी नमूद केले.

इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करा

यावेळी अरणगाव मानवसेवा प्रकल्पाचे अंबादास गुंजाळ, केडगाव सावलीचे सुरेश झडे, तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पच्या रुक्मिणी ठोंबरे, मोहजखूर्द येथील मानवसेवा प्रतिष्ठानचे प्रा. सुनील मतकर आदी उपस्थित होते संस्थेचे उपाध्यक्ष दशरथ खोसे यांनी मनोगत व्यक्त करताना, सणांचा खरा आनंद इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यात असतो. दिवाळीच्या निमित्ताने गरजू संस्थांना मदत करून त्यांच्या कार्याला हातभार लावण्याचा प्रशालेचा प्रयत्न निश्चितच महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

सहसचिव राजेश झालानी यांनी सामाजिक संस्थांचे कार्य समाजासाठी मोलाचे असून अशा संस्थांना वेळोवेळी सहकार्य मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधताना त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, इतरांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची वृत्ती विकसित व्हावी आणि समाजाप्रती असलेले कर्तव्य समजावे, या उद्देशाने प्रशाला विविध उपक्रमांचे आयोजन करीत असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे खजिनदार विजय मुनोत यांनी प्रशालेच्या माध्यमातून शिक्षणासोबत सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात असल्याचे सांगत, समाजातील गरजू घटकांसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

विद्यार्थी हिताच्या उपक्रमांची माहिती

प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका योगिता गांधी यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या व प्रशालेच्या वतीने वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सामाजिक आणि विद्यार्थीहिताच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची ओळख प्रत्यक्ष कृतीतून व्हावी, हा अशा उपक्रमांमागील महत्त्वाचा हेतू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा, उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव र. दो. कासवा, सहसचिव राजेश झाला, खजिनदार विजय मुनोत, विश्वस्त रश्मी येवलेकर, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक दत्तात्रय कसबे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका योगिता गांधी आदी उपस्थित होते.

माणुसकी आणि सेवाभावाची संस्कृती

दिवाळी भेट उपक्रमाच्या माध्यमातून चार स्वयंसेवी संस्थांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यात आला. केवळ सण साजरा करण्यापुरता विचार न करता समाजातील गरजू घटकांचाही आनंदात सहभाग असावा, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. शिक्षणसंस्थांनी शैक्षणिक कार्यासोबतच सामाजिक जाणीव जपणारे उपक्रम राबविल्यास समाजात सहकार्य, माणुसकी आणि सेवाभावाची संस्कृती अधिक दृढ होण्यास मदत होते. सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या या उपक्रमातून हाच सकारात्मक संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री कोदे यांनी केले, तर आशा रोकडे यांनी आभार मानले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची अहिल्यानगरच्या ब्रह्माकुमारीजच्या प्रतिनिधींनी घेतली भेट



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सोनई सेवा केंद्राच्या प्रभारी बी.के. ऊषा दीदी आणि बी.के. डॉ. दीपक हरके यांनी ब्रह्माकुमारीजच्या मेडिकल विंगमार्फत भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 'नशामुक्त भारत अभियानाची' माहिती राष्ट्रपतींना दिली.

नगर – भारताच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी ३१ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रातील नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या शुभारंभानिमित्त आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांना उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी नाशिक येथील रामकुंडावर धर्मध्वज पूजन व ध्वजारोहण केले. तसेच गोदावरी नदीचे पूजन आणि महाआरतीमध्ये सहभाग घेतला. या कार्यक्रमात कुंभमेळ्याच्या अधिकृत संकेतस्थळाचे व गीताचे लोकार्पण तसेच विशेष टपाल तिकिटांचे विमोचनही करण्यात आले. याच दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथील अतिथीगृहात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सोनई सेवा केंद्राच्या प्रभारी बी.के. ऊषा दीदी आणि बी.के. डॉ. दीपक हरके यांनी ब्रह्माकुमारीजच्या मेडिकल विंगमार्फत भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 'नशामुक्त भारत अभियानाची' सविस्तर माहिती राष्ट्रपतींना दिली.

सन २०२३ मध्ये मंत्रालयासोबत सामंजस्य करार झाल्यानंतर ब्रह्माकुमारीजच्या मेडिकल विंगद्वारे देशभरात व्यसनमुक्त जीवनशैली, जनजागृती, सामाजिक सहभाग आणि व्यसनमुक्तीची शपथ अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून अभियानाला योगदान दिले जात आहे.

ऑगस्ट २०२६ पर्यंत या जनजागृती मोहिमेद्वारे देशभरातील सुमारे ३.५२ कोटी नागरिकांपर्यंत व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यात आला आहे. विशेष म्हणजे, देशभरात ३६ अत्याधुनिक ऑडिओ-व्हिज्युअल जनजागृती वाहनांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात व्यसनमुक्तीचा संदेश दिला जात आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये आयोजित विशेष व्यसनमुक्ती शपथ महाअभियानाची माहितीही यावेळी देण्यात आली. राष्ट्रीय डॅशबोर्डवरील २९ ऑक्टोबर रोजी अद्ययावत आकडेवारीनुसार, या अभियानांतर्गत एकूण ४,७१,०६,५४३ शपथा नोंदविण्यात आल्या असून १,१७,२७२ वैयक्तिक शपथांची नोंद झाली आहे. या अभियानात देशातील २८ राज्ये आणि ६ केंद्रशासित प्रदेशांमधील नागरिकांचा सहभाग नोंदविण्यात आला आहे. जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून ऑक्टोबर २०२६ पर्यंत सुमारे ८.५ कोटी लोकांपर्यंत पोहोचण्याचा टप्पा गाठण्यात आला आहे. ब्रह्माकुमारीजच्या माध्यमातून देशभरात सुरू असलेल्या या व्यापक जनजागृती मोहिमेचे राष्ट्रव्यापी स्वरूप, सामाजिक सहभाग आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी सुरू असलेले प्रयत्न यांची माहिती यावेळी सादर करण्यात आली.

या प्रसंगी बी.के. ऊषा दीदी आणि बी.के. डॉ. दीपक हरके यांनी महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना निराकार परमपिता परमात्मा शिव यांचा परिचय देणारी फ्रेम भेट देऊन त्यांचा सन्मान केला.

एम.डी.एस. परिक्षेत मोनल कोहोक उत्तीर्ण



नगर – केडगाव, अहिल्यानगर येथील मोनल कोहोक ही नुकतीच महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ ही ऑफ हेल्थ सायन्सस तर्फे घेण्यात आलेली दंतवैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर परीक्षा (एम.डी.एस.) विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली.

मोनल कोहोक यांचे पदवी तसेच पदव्युत्तर शिक्षण नायर डेंटल कॉलेज, मुंबई येथे झाले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय मासिक 'नेचर' आणि 'जर्नल डेन्स्ट्री' मध्ये शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. ती ॲड. अजय कोहोक आणि नेहा कोहोक यांची कन्या असून तिचे या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.



जैन वात्सल्य संस्थातर्फे गरजूंना किराणा, साडी व मिठाईचे वाटप करण्यात आले.

जैन वात्सल्य संस्थातर्फे गरजूंना किराणा, साडी व मिठाईचे वाटप

नगर – जैन ओसवाल वात्सल्य संस्थेमार्फत दर महिन्याप्रमाणे गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा व अन्नधान्य वाटप सुशिल माणिकचंद मुथा व परिवाराच्या हस्ते करण्यात आले. दिवाळीनिमित्त लाभार्थी परिवारांना भाऊबीजेची साडी व मिठाई सुद्धा देण्यात आली. श्रीमती केशरबाई माणिकचंद मुथा (बँकवाला) यांच्या परिवाराने या उपक्रमासाठी सहकार्य केले. धार्मिक परीक्षा बोर्ड समोरील सचिन अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी विजया मुथा, ॲड. अमृत मुथा, प्रज्योत मुथा, समीक्षा मुथा, संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, उपाध्यक्ष सुभाष मुथा, खजिनदार सतीष मुथा, सेक्रेटरी विजय गुगळे, सदस्य अजित बोरा (पिंपळगाव), सचिन चोपडा, मूळचंद डागा, विजय गुंदेचा, ईश्वर बोरा, प्रमोद गांधी आदी उपस्थित होते.

रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी घेतली प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ



नगरमधील रेसिडेन्शिअल हायस्कूल येथे सर्व शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली.

नगर – दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश, स्नेह व प्रेमाचा सण. मात्र, या आनंदोत्सवात फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण टाळून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश रेसिडेन्शिअल हायस्कूल येथील विद्यार्थ्यांना दिला. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शाळेत प्रदूषणमुक्त दिवाळी हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ पर्यवेक्षक धनंजय म्हस्के यांनी सामूहिक सर्वांना दिली व सर्व शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी शपथ घेतली.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे निर्माण होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच त्याचे मानवी आरोग्य, पशुपक्षी, प्राणी आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. फटाक्यांच्या आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच पशुपक्ष्यांना, प्राण्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्याचबरोबर फटाक्यांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावून आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे सण साजरा करताना इतरांच्या आरोग्याचा आणि निसर्गाचा विचार करणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता दिवे, पणत्या आणि पर्यावरणपूरक सजावटीच्या माध्यमातून दिवाळी साजरी करण्याचा निर्धार केला. तसेच वृक्षांचे संवर्धन करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करणे, याबाबतही विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापक विजय जाधव म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रदूषणमुक्त दिवाळी हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित उपक्रम नसून पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः फटाके न फोडण्याचा संकल्प करण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना आणि परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रेरित करावे. निसर्गाचे रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक भाऊसाहेब पवार, पर्यवेक्षक धनंजय म्हस्के, शरद सोनवणे, वैशाली मरकड व सर्व शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.



निरीक्षणगृह व बालगृहामध्ये आयएमए लेडीज विंगच्या वतीने दिवाळीनिमित्त फराळ, मिठाई व दिवाळी साहित्याचे वाटप करण्यात आले. (छायाचित्र – समीर मन्यार)

आयएमए लेडीज विंगच्या वतीने बालगृहातील मुलांना मिठाई, दिवाळी साहित्याचे वाटप

नगर – दिवाळीच्या आनंदोत्सवात गोरगरीब व निराधारांना सामावून घेत अहिल्यानगर येथील निरीक्षणगृह व बालगृहामध्ये आयएमए लेडीज विंगच्या वतीने दिवाळीनिमित्त विंगच्या अध्यक्षा मंजिरी झेंडे यांच्या उपस्थितीत फराळ, मिठाई व दिवाळी साहित्याचे तसेच नवजात शिशु बालगृहातील चिमुकल्यांसाठी फॉर्म्युला मिल्कचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी बालगृहातील मुलांशी संवाद साधताना डॉ.मंजिरी झेंडे म्हणाल्या की, आम्ही आमच्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी करतोच परंतु तुमच्यासारख्या मुलांसोबत दिवाळी साजरी करण्यात एक वेगळाच आनंद मिळतो. बालगृहातील मुलांनी आपले भविष्यातील उच्च स्वप्न उंचावून ते पूर्ण करावेत आणि मोठे होऊन समाजातील वंचित घटकांना करावी. दिवाळी हा केवळ रोषणाईचा किंवा फराळाचा सण नसून तो आनंद वाटण्याचा आहे.

याप्रसंगी विंगच्या सचिव डॉ. क्रांती खालकर, खजिनदार डॉ. सुजाता नरवडे, बालगृहाचे ट्रस्टी डॉ. अमित बडवे, कांचन रच्चा, डॉ.नीलम बागल, डॉ. मेघना पाटणकर, डॉ. संध्या कवडे, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ. सोनल बोरुडे, डॉ. हेमा सुराणा आदींसह आय एम ए लेडीज विंगच्या सदस्या उपस्थित होत्या.

सचिव क्रांती खालकर म्हणाल्या की, डॉक्टर म्हणून रुग्णांची सेवा करणे हे आमचे कर्तव्य आहेच परंतु त्यासोबतच समाजातील प्रत्येक घटकाशी सामाजिक बांधिलकी जपणे आणि आनंद वाटणे हे पण अत्यंत महत्त्वाचे आहे. दिवाळीत आपण विविध प्रकारच्या फराळाचा आणि पदार्थांचा आस्वाद घेतो मात्र दिवाळीचा खरा आनंद हा वाटण्यात आहे. जेव्हा आपण आपला आनंद इतरांसोबत वाटतो तेव्हा तो द्विगुणित होतो असा मोलाचा संदेश यावेळी त्यांनी मुलांना दिला.

खजिनदार सुजाता नरवडे म्हणाल्या की, परिस्थिती प्रत्येकाची सारखी नसते परंतु उच्च स्वप्ने सर्वांनीच पहावीत. त्यामुळे भरपूर स्वप्ने बघा त्यासाठी कठोर मेहनत घ्या नेहमी आनंदी राहा आणि आयुष्यात यशस्वी व्हा समाजापासून वंचित असलेल्या घटकांना मदत करा करून आपले आयुष्य उज्वल करा असे ते म्हणाल्या.

उपक्रमासाठी डॉ. कांचन रच्चा यांचे मार्गदर्शन लाभले. सुजाता नरवडे यांनी आभार मानले.

भिंगारच्या विश्वशंकर विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गरजू कुटुंबांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या विश्वशंकर प्राथमिक विद्यालय, भिंगार येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत गरजूंना दीपावली-निमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. सणानिमित्त केवळ स्वतःच्या घरात आनंद साजरा न करता समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्याही जीवनात आनंदाचा प्रकाश पोहोचविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. त्यानुसार विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या मदतीने तसेच स्वतः पुढाकार घेऊन दीपावलीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध वस्तू जमा केल्या. त्यानंतर शिक्षकांसमवेत विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर शहरातील डीएसपी चौक, स्टेट बँक चौक तसेच रेल्वे स्टेशन परिसरात जाऊन गरजू व वंचित नागरिकांना या साहित्याचे वाटप केले.

हा उपक्रम संस्थेच्या रितू दीदी ॲबट यांच्या प्रेरणेने, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य इंजि. विजय बेरड यांच्या उपस्थितीत, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नारायण अनभुले यांच्या संकल्पनेतून पार पडला. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राथमिक विभागातील सौ. प्रतिभा पाठक, सौ. मनिषा गवळी, श्रीमती भाग्यश्री धोंडे, सौ. ज्योती शेळके, श्रीमती रंजिता गलांडे आणि विजय कासार यांनी परिश्रम घेतले. तसेच माध्यमिक विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती कविता शिंदे, प्रदीप पाडळे, श्रीमती क्रांती घायतडक आणि श्रीमती जयश्री मोरे यांनीही विद्यार्थ्यांसह प्रत्यक्ष उपस्थित राहून साहित्य वाटपाच्या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.



रयत शिक्षण संस्थेच्या विश्वशंकर प्राथमिक विद्यालय, भिंगार येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत गरजूंना दीपावलीनिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

गृहिणी

आरोग्य

व्यसनांचा परिणाम

आजच्या काळात धूम्रपान, मद्यपान आणि तंबाखू सेवन याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे आणि हे चित्र शहरापासून खेड्यापर्यंत सर्वत्र दिसून येते. लहान वयात मित्रांच्या संगतीमुळे किंवा मानसिक तणावामुळे सुरू झालेले हे व्यसन हळूहळू सवय बनते आणि नंतर आयुष्याचा भाग बनून जाते. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीच्या शरीरात विषारी धूर जातो त्यामुळे फुफ्फुसाची क्षमता कमी होते, सतत खोकला येतो, दम लागतो, श्वसनाचे आजार जडतात आणि कालांतराने फुफ्फुसाचा कर्करोग होण्याचा धोका कित्येक पटीने वाढतो, एवढेच नाही तर धूम्रपान न करणाऱ्या कुटुंबातील सदस्यांनाही त्याचा त्रास सहन करावा लागतो. तंबाखू, गुटखा, मावा, खर्रा यांसारखे पदार्थ खाण्याचे प्रमाण तरुणांमध्ये आणि शेतकरी वर्गात मोठे आहे, यामुळे तोंड न उघडणे, तोंडात जखमा होणे, दात किडणे, हिरड्या कमकुवत होणे, तोंडाला वास येणे आणि पुढे जाऊन तोंडाचा आणि घशाचा कर्करोग होणे असे गंभीर परिणाम दिसतात. मद्यपानामुळे तर व्यक्तीचे संपूर्ण आयुष्यच उद्ध्वस्त होते, सुरुवातीला थोड्या प्रमाणात घेतलेले मद्य हळूहळू वाढत जाते, त्यामुळे यकृताला सूज येते, यकृत खराब होते, पोटात अल्सर होतो, भूक मंदावते, शरीरात जीवनसत्वांची कमतरता निर्माण होते, रक्तदाब वाढतो, हृदयाचे ठोके अनियमित होतात, हात थरथरतात, झोप लागत नाही आणि मेंदूवर परिणाम झाल्याने निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. या व्यसनांचा परिणाम फक्त एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही तर संपूर्ण कुटुंबाला त्याची झळ बसते, घरातील कमाई व्यसनात खर्च होते, मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते, पती पत्नीमध्ये वाद वाढतात, समाजात मानहानी होते आणि अनेकदा अपघात आणि गुन्हेगारीच्या घटना घडतात. म्हणूनच वेळीच सावध होणे गरजेचे आहे, शाळा महाविद्यालयातून जनजागृती करणे, गावोगावी व्यसनमुक्ती शिबिरे घेणे, चांगले छंद जोपासणे, खेळ, व्यायाम, भजन, वाचन यात मन गुंतवणे, आणि व्यसन सोडण्यासाठी कुटुंबाने प्रेमाने आधार देणे हे उपाय प्रभावी ठरतात.

पाककला

मेदूवडा सांबार

साहित्य : उडीद डाळ १ वाटी, तांदळाचे पीठ २ चमचे, बारीक चिरलेली हिरवी मिरची २, बारीक चिरलेले आले १ चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा, कढीपत्ता ८ ते १० पाने, मीठ चवीनुसार, तेल तळण्यासाठी सांबारसाठी तूरडाळ १/२ वाटी, बारीक चिरलेला कांदा १ लहान, बारीक चिरलेला टोमॅटो १, शिजवलेला भोपळा, गाजर, शेवग्याच्या शेंगा प्रत्येकी १/२ वाटी, चिंचेचा कोळ १ चमचा, सांबार मसाला २ चमचे, हळद १/४ चमचा, मोहरी १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, हिंग चिमूटभर, तेल २ चमचे, मीठ चवीनुसार

कृती : उडीद डाळ ४ तास पाण्यात भिजत घाला. पाणी काढून मिक्सरमध्ये थोडे पाणी घालून घट्ट व फुलके वाटून घ्या. त्यात तांदळाचे पीठ, हिरवी मिरची, आले, कोथिंबीर, कढीपत्ता आणि मीठ घालून मिश्रण एकजीव करा. हाताला पाणी लावून मिश्रणाचा गोळा घ्या, मध्ये भोक पाडून वड्याचा आकार द्या. कढईत तेल गरम करून मध्यम आचेवर दोन्ही बाजूने खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत तळून घ्या. दुसरीकडे तूरडाळ कुकरमध्ये शिजवून घ्या. कढईत तेल गरम करून मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता घाला. त्यात कांदा, टोमॅटो, भाज्या घालून परता. त्यात हळद, सांबार मसाला, चिंचेचा कोळ, मीठ आणि शिजवलेली डाळ घालून पाणी घालून उकळी येऊ द्या. तयार गरम सांबार आणि खोबऱ्याच्या चटणीबरोबर मेदूवडा गरम सर्व्ह करा.

वास्तू

शांतता राहण्यासाठी

* घरात उत्तरेला मोरपिस लावल्याने शांतता राहते.
* घरात वायव्येला खिडकी असेल तर हवा खेळती राहते आणि आजार कमी होतात.
* घरात दोन आरसे समोरासमोर लावू नका.

सौंदर्य

* हळदीचे दूध रात्री प्यायल्यास त्वचेवर तेज येते.
* आवळा रोज खाल्ल्यास केस पांढरे होत नाहीत.

सल्ला

पापड तळताना तेलात चिमूटभर मीठ टाका, जास्त तेल पित नाही.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६

धनत्रयोदशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, हस्त २८।४३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : आज कामाच्या ठिकाणी तुमच्या कष्टाचे फळ मिळेल.

वृषभ : धनलाभ होण्याची शक्यता आहे. जुन्या मित्राची भेट होईल.

मिथुन : मनातील इच्छा पूर्ण होईल. प्रवासाचे योग आहेत.

कर्क : कुटुंबाकडून चांगली बातमी मिळेल. मन प्रसन्न राहील.

सिंह : मान सन्मान वाढेल. नवीन काम सुरू होईल.

कन्या : आरोग्यात सुधारणा दिसेल. थकलेले पैसे परत मिळतील.

तुळ : जोडीदाराबरोबर वेळ चांगला जाईल.

वृश्चिक : अचानक धनप्राप्ती होईल. शत्रू दूर होतील.


धनु : भाग्य तुमच्या बाजूने राहील. नवीन संधी मिळेल.

मकर : नोकरीत बढतीचे योग आहेत. घरात शुभ कार्य घडेल.

कुंभ : मनासारखी गोष्ट घडेल. दिवस उत्साहात जाईल.

मीन : प्रेम संबंधात गोडवा वाढेल. आर्थिक स्थिती मजबूत होईल.

फिल्मीचक्कर क्र. १२६१ सौ. शैलजा कुलकर्णी



++ प्यार के चर्चे हर जबान पर सबको मालूम है (गाणे) १२) 'राम तेरी गंगा मैली' चित्रपटाची नायिका १५) एक अभिनेत्री -+++ शेषाद्री

उभे शब्द :- १) चौदहवी का ++ + + ++++ हो जो भी हो तुम खुदा की (गाणे) २) ये ++ गगन के तले धरती का प्यार फले (चित्रपटाचे नाव) ३) +++ वस्तावय्या रमय्या वस्तावय्या (गाणे) ४) +++ पैदा करनेवाले की (चित्रपटाचे नाव) ८) जितेंद्र, श्रीदेवी, शक्ती कपूर, कादरखान यांचा एक चित्रपट ९) ++ मेरे सपने (चित्रपटाचे नाव) १०) ++ ++ आओ मेरे दोस्तो एक किस्सा (गाणे) १३) ++ काटकर (एक अभिनेत्री) १४) ++ गुप्ता (एक अभिनेत्री)

आडवे शब्द :- १) अतुल कुलकर्णी, तब्बू यांचा एक चित्रपट ५) राजेश खन्ना, श्रीदेवी, जितेंद्र, जयाप्रदा, कादरखान यांचा एक चित्रपट ६) अनहोनी को ++ कर दे होनी को अनहोनी (अमर अकबर अँथनी चित्रपटातील गाणे) ७) मेरे ++ (चित्रपटाचे नाव) ११) ++ ++ ++

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : जिंकणे म्हणजे केवळ स्पर्धा जिंकणे नव्हे, तर स्वतःला दररोज प्रगत करणे होय.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

जुने प्रिस्क्रिप्शन वापरून औषध घेणे खरोखरच सुरक्षित आहे का?

जुनाट किंवा आधी दिलेला वैद्यकीय सल्ला आणि जुने चिठ्ठीपत्रक वापरून पुन्हा औषधे सुरू करणे आरोग्याच्या दृष्टीने किती घातक ठरू शकते, याचे गांभीर्य समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा रुग्णाला महिनाभरानंतर पुन्हा एकदा तशीच सर्दी, ताप किंवा खोकल्याची लक्षणे जाणवू लागतात, तेव्हा नकळत त्याच्या मनात आधीच्या उपचारांची आठवण येते आणि तो सोपा मार्ग म्हणून तीच औषधे मेडिकलमधून आणण्याचा प्रयत्न करतो. परंतु, मानवी शरीर आणि आजार यांची रचना ही साधी किंवा स्थिर नसते. आजाराची पुनरावृत्ती झाली तरी त्यामागील सूक्ष्म जंतूंचे स्वरूप, शरीरातील रोगप्रतिकारशक्तीची स्थिती आणि हवामानातील बदलांमुळे होणारे संक्रमण पूर्णपणे वेगळे असू शकते. अशा परिस्थितीत कोणतीही खात्री बाळगून जुने उपचार स्वतःच्या मनाने राबवणे म्हणजेच स्वतःच्या आरोग्याशी खेळ खेळण्यासारखे आहे.

वैद्यकीय क्षेत्रात प्रत्येक आजाराचे निदान हा अत्यंत बारकाईने केला जाणारा अभ्यास असतो. महिनाभरापूर्वीच्या त्रासासाठी जेव्हा डॉक्टरांनी तपासणी करून औषधे लिहून दिली होती, तेव्हाची शरीराची ताकद आणि आजची शारीरिक स्थिती यात मोठा फरक असू शकतो. जर तीच औषधे कोणतीही नवी तपासणी न करता पुन्हा घेतली, तर शरीरातील अंतर्गत अवयवांवर प्रचंड ताण येऊ शकतो. विशेषतः लिव्हर आणि किडनीसारखे महत्त्वाचे अवयव शरीरातील रासायनिक द्रव्यांचे आणि औषधांचे संतुलन राखत असतात. जर आजाराच्या स्वरूपाशी न जुळणारी औषधे पोटात गेली, तर या अवयवांना नको असलेल्या विषारी द्रव्यांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे भविष्यात मूत्रपिंडाचे किंवा यकृताचे गंभीर विकार जडू शकतात. याशिवाय, औषधांच्या अयोग्य मात्रेमुळे शरीरावर विपरीत परिणाम होऊन ऍलर्जी, त्वचाविकार किंवा अंगावर लाल पुरळ उठणे यांसारखे त्रासही उद्भवू शकतात.

जुनी औषधे वापरण्यामागे आणखी एक मोठा धोका म्हणजे औषधांची कालबाह्यता किंवा साठवणूक करण्याची पद्धत. घरात उघड्यावर पडलेली किंवा योग्य तापमानात न ठेवलेली जुनी औषधे गुणधर्म गमावून बसतात आणि ती रासायनिकदृष्ट्या बदलून शरीरासाठी विषारी बनतात. अनेकदा औषधांच्या बाटल्यांवर किंवा पाकिटांवर छापलेली मुदत संपलेली असते, जी आरोग्यासाठी अत्यंत विघातक ठरते. या सर्व धोक्यांच्या पलीकडे जाऊन विचार केला तर, मानवी शरीरात जिवाणू किंवा विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जी प्रतिजैविके किंवा औषधे वापरली जातात, त्यांच्या वापराचे एक विशिष्ट तंत्र असते. जर एखादे प्रतिजैविक वारंवार किंवा विनाकारण डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतले गेले, तर शरीरातील आजार निर्माण करणारे घटक त्या औषधाविरुद्ध स्वतःची एक वेगळी कवचकुंडल वा प्रतिकारशक्ती तयार करतात. या प्रक्रियेमुळे भविष्यात जेव्हा खरोखरच त्या औषधाची अत्यंत तीव्रतेने गरज असते, तेव्हा ते औषध शरीरावर कोणताही प्रभाव दाखवत नाही आणि आजार बळावत जातो.

या सर्व सखोल बाबींचा विचार करता, जुन्या चिठ्ठीवर किंवा महिनाभर जुन्या अनुभवावर विसंबून राहून पुन्हा औषधे सुरू करणे हा कधीही योग्य पर्याय असू शकत नाही. शरीराने दिलेले कोणतेही लक्षण हे अंतर्गत बदलांचे किंवा धोक्याचे संकेत असतात. त्यामुळे जेव्हा कधी असा त्रास पुन्हा उद्भवेल, तेव्हा कोणत्याही शॉर्टकटचा किंवा आधीच्या उपचारांचा आधार न घेता, थेट अनुभवी वैद्यांची किंवा डॉक्टरांची भेट घेणे आणि संपूर्ण शारीरिक तपासणी करून घेणे हाच एकमेव सुज्ञ आणि सुरक्षित मार्ग आहे.

अन्नाचा अपव्यय

दहावीत शिकणारा रोहन हुशार होता, पण त्याला जेवणात ताटात अन्न शिल्लक सोडण्याची वाईट सवय होती. आई त्याला नेहमी सांगायची, बाळा, अन्नाची नासाडी करू नये, अन्न हे पूर्णब्रह्म आहे. पण रोहन तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायचा.

उन्हाळ्याच्या सुट्टीत रोहन गावाकडे आजोबांकडे गेला. एक दिवस आजोबा त्याला घेऊन शेतात गेले. दुपारच्या वेळी सगळे जेवायला बसले. एका मजुराकडे फक्त एक कोरडी भाकरी आणि कांदा होता, तरीही तो अत्यंत आनंदाने आणि आवडीने ती खात होता.

दुसरीकडे, रोहनच्या ताटात भरपूर जेवण होते. दोन घास खाऊन रोहन म्हणाला, आजोबा, मला ही भाजी नकोय, मी अर्धी पोळी फेकून देतो.

हे ऐकून आजोबांनी रोहनला जवळच्या मातीकडे नेले आणि प्रेमाने म्हणाले,

बेटा, हे ताटातले अन्न फेकून देण्यापूर्वी विचार कर. हे मूठभर अन्न उगवण्यासाठी शेतकऱ्याने उन्हाळ्यात किती घाम गाळला आहे! आपण अन्न वाया घालवतो, तेव्हा आपण त्या शेतकऱ्याच्या कष्टाचा अपमान करतो.

आजोबांचे हे शब्द रोहनच्या जिव्हारी लागले. त्याला शहरात रोज वाया जाणारे अन्न आणि स्वतःची वागणूक आठवली. त्याला स्वतःचीच लाज वाटली. त्या दिवसापासून रोहनने कधीही अन्नाची नासाडी केली नाही. ताटात संपेल तेवढेच वाढून घेण्याचा नियम त्याने आयुष्यभर पाळला.

बोध : कष्टाने मिळवलेल्या अन्नाचा कधीही अपमान करू नका, कारण अन्नाचा प्रत्येक कण अमूल्य आहे.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

आम्ही अंतरीय मंडळांचे बावचीत कसे जाणू शकतो अंतरी अनेक अश्याच मंडळे आहेत. त्यांची स्पर्शता महात्म्यांनी आमच्याशी आखडलेली आहेत. जरी त्यांनी ह्या मंडळांची ओळख पटवण्याची वेगवेगळ्या नावांचा प्रयोग केला आहे तरीसुद्धा त्यांचे अनुभव एकसारखे आहेत. वेगवेगळी नावे दिल्याने लोकांना ती मंडळे वेगवेगळी वाटतात. पुढील उदाहरणादाखल ते सैटल, सगळ्या, तीन माणसे, फ्रान्स निवासी, भारतीय आणि अमेरिकन काश्मिरला जातात. काश्मिरच्या फुलाचे वर्णन करताना फ्रेंच त्यात 'जे फ्लर्टास' असे म्हणतो.

भारतीय त्यास 'फुल' म्हणतो तर अमेरिकन त्यास 'फ्लॉवर्स' ह्या नावाने ओळखतो. दृश्य वस्तू, फुल फुल एकच आहे. फरक समजविण्यासाठी वेगवेगळ्या शब्दांचा वापर केला जातो. समाजा हा प्रवासांमध्ये जे काही पाहिले ते छापून प्रकाशित केले आणि उपरोक्त भाषा न जाणणारा, वेगळ्या देशात आलेला वेगळा माणूस हा हे वाचेल तर भाषा न जाणणाऱ्याने ते वाचितल्याने त्याला असे वाटेल की हे तीन प्रवासी वेगवेगळ्या ठिकाणी पर्यटनास गेले आहेत. पण प्रत्यक्ष का गेलेला अनुभवी मनुष्य असेल तर तो सांगू शकेल की हे फ्रेंच, भारतीय आणि अमेरिकन एकाच दृश्याचे वर्णन करीत आहेत. फरक त्यासाठी शब्द वेगवेगळे वापरले आहेत. तेव्हा वेगवेगळ्या देशातून आलेली माणसे वेगवेगळ्या भाषा वापरतात. म्हणूनच शेकडो वर्षे गेल्यानंतर त्यांनी लिहिलेली पुस्तके वाचून ते एकाच प्रदेशात गेले होते असे आम्हाला वाटत नाही. अंतरीव मंडळाच्या वर्णनात आगामीही एक समस्या उपस्थित होते ती म्हणजे त्यांना वेगवेगळ्या विभागात टाकणे. उदा. कोणी एक प्रवासी त्यांच्या गुंफांमधील अनुभवास त्यांचे ५ भाग करतो तर दुसऱ्या वेगळ्या वैशिष्ट्याने ७ भागात वर्णन करतो. कोणी तिसरा तीनच भागात कसे घडते? समजा आम्ही नायगारा धबधबा पाहावयास गेलो.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : आणि जर मुलाची नीट काळजी घेण्यात नवऱ्याला यश मिळालं तर?

शिवानीदिदी : कदाचित तिला त्याचा आनंद होणार नाही. कधीही एखादं काम आपल्यापेक्षा चांगलं कोणी करू शकत नाही, असा आपल्याला विश्वास असतो. आपल्या कुटुंबातील एखाद्याला जरी ते जमलं तरी आपण ते पटकन स्वीकारू शकत नाही किंवा आपल्याला त्याचं कौतुक वाटत नाही. आपण आपल्या विचारसरणीत सजग राहायला हवं आणि आपण काही चांगलं केल्याबरोबर जसा आपल्याला आनंद होतो तसंच इतरांच्या जीवनातही काही चांगलं झाल्यावर आपल्याला तसंच वाटतं का हे तपासायला हवं. अशा प्रकारे आपल्या कुटुंबातील सदस्यांमध्येच आपण इतरांमधीलही प्रेमाची ऊर्जा निर्माण करू शकतो.तेव्हा, स्पर्धा कधीही चांगली नसते.

नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय : या साधनेची सुरुवात शाळेपासून होते जेव्हा मुले खेळण्याच्या खेळामध्ये मग्न करतात.शिवानी सिंधी : मी सगळी खेळी आहे कारण तिथे आपण समजतो हेपर्यंत सर्व काही जेव्हा असामान्यपणे आपोआप साध्य, खेळला लागतो आणि स्पर्धा करतो. कधी तेव्हा मी घोड्यावरून करतो. त्यानंतर आपण नक्की कोणाची स्पर्धा करतो आहोत ह्याची जाणीव नसते. पालक आणि मुले यांच्यामध्ये स्पर्धा होऊ शकते.एक उदाहरण घ्या. या, अनेक वर्षे करून एक वडील व्यवसायात सामाज्य उस कमावत, त्यात, समाज २० वर्षांनी त्याच्या मुलगा येतो तो व्यवसाय बापाच्या साम इनचा त्या मुलगा त्याची नवीन कल्पनांनी वाटतो त्या संस्थेत काही सकारात्मक बदल करतो आणि त्याची प्रगती झाली किंवा संस्थेतील कर्मचाऱ्यांनी तो खूप वडील त्यांना पर कधीपर्यंत वाढविण्यास सुद्धा नसते ते आवडणार नाही, त्या कोणी वडील त्यांच्या मुलाबद्दल मत्सर करतात.त्याला कर्मचाऱ्यांसोबत जर वचवाल तर बायकांचे देखील असतील, आणि नानाची ते आवडले नसेल तर वाचा अर्थ जोडण्याचा तुम्हा साध्य आहे, त्यामुळे त्यांना एखादी गोष्ट आपल्याबरोबर कोणी

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

पती : तुझ्यासाठी मी चंद्र-सूर्य सुद्धा खाली आणू शकतो!

पत्नी (प्रेमाने) : अहो सोडा ते... जरा उठून किचनमधून गरमागरम चहा आणि पोहे घेऊन या ना!

पती : अं... राहू दे, मग मी चंद्रच घेऊन येतो!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतातील पहिली रेल्वे धावलेली मार्ग कोणती?

– मुंबई ते ठाणे (१६ एप्रिल १८५३ रोजी पहिली ट्रेन धावली)

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

गर्भवतीची मानसिकता ही आसपासच्या वातावरणावर, घरातील इतर सदस्यांवर बऱ्याच अंशी अवलंबून असते. लग्न झाल्यानंतर नववधू जेव्हा नवीन घरात झालेली असते त्यावेळी ती बुजलेली, आज्ञाधारक, अबोल, एकदम उलट उत्तर न देणारी अशी वागत असते.हळूहळू ती मनमोकळी वागू लागली की सर्व भावभावना ती स्पष्टपणे व्यक्त करायला सुरवात करते त्यामुळे तिला पहिले झालेले मूल समंजस, आज्ञाधारक, अबोल, बुजलेले होण्याची शक्यता जास्त असते. तसेच नंतरच्या परिस्थितीत झालेले मूल तुलनेत वास्तववादी आणि चटपटीत किंवा बिनधास्त मानसिकतेचे जाणवते. विशेषतः पतीने गर्भवती स्त्रीची काळजी घ्यावी. गर्भवतीचे मन आनंदी कसे राहील, याची काळजी घ्यावी. गर्भवतीने मधुर संगीत ऐकणे, हास्य विनोदात वेळ घालविणे, मायेचा आधार वाटेल अशा व्यक्तींच्या सहवासात राहणे फार जरुरीचे असते. घरातील सदस्यांनी तिला आपुलकीने जपावे, तिला मायेचा, प्रेमाचा आधार द्यावा. इतर सदस्यांनी तिला घरकामात मदत करावी. घरातील वातावरण नेहमी प्रसन्न व आनंदी ठेवावे.

पहिल्या एक ते तीन महिन्यात गर्भवतीला खूप उलट्या व मळमळ होते. अशा अवस्थेत तिला खाण्याची इच्छा होत नाही. तेव्हा घरातील इतर महिला सदस्यांनी तिच्या खाण्याची काळजी घ्यावी या दिवसात वेगवेगळे पदार्थ खाण्याची इच्छा होते. स्वतः बनवलेले पदार्थ नको वाटतात, इतरांनी प्रेमाने बनवलेले पदार्थ ती आवडीने खाते.

गर्भवतीची खाण्याची इच्छा बाळामार्फत झालेली असते; त्यामुळे बाळाचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी गर्भवतीचे डोहाळे पुरवावे, परंतु डोहाळे पुरविताना खाण्याचे पदार्थ हे घरातील सकस, पौष्टिक असावे. अती चमचमीत, तेलकट, मसालेदार, अती गोड मिठाई असे पदार्थ खावयास देऊ नये. याने बाळाचे पोषण होण्याऐवजी गर्भवतीचे आरोग्य बिघडते.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

धम्माल मनोरंजन

सुविचार




मला जे जमते ते इतर कोणालाही जमते.
कारण मी एक सामान्य माणूस आहे.

दिनविशेष ०६ नोव्हेंबर

१८६० : अब्राहम लिंकन यांची युनायटेड स्टेट्सचे १६ वे अध्यक्ष म्हणून निवड झाली.१८८८ : महात्मा गांधींनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लंडनमध्ये प्रवेश घेतला.१९१२ : भारत या वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला.१९१३ : दक्षिण आफ्रिकेत भारतीय वंशाच्या खाण कामगारांच्या आंदोलनाचे नेतृत्व केल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.१९५४ : या दिवशी मुंबई राज्यात बॉम्बे इलेक्ट्रिसिटी बोर्डाची स्थापना झाली..`.१९९९ : भारतीय शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना विकसनशील देशांना जैवतंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याच्या कार्यासाठी युनेस्को गांधी सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले. .२००५ : म्यानमारच्या लष्करी राजवटीने आपली राजधानी रंगूनहून पायनमाना येथे हलवली. २०१२ : बराक ओबामा आणि जो बिडेन अनुक्रमे दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष म्हणून निवडून आले.२०२४ : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा निवडून आले आणि उपाध्यक्ष जेडी व्हॅन्स निवडले गेले. जन्म :१८१४ : ॲडोल्फ सॅक्स सॅक्सोफोन या वाद्याचे जनक यांचा जन्म. (मृत्यू : ४ फेब्रुवारी १८९४)१८३९ : भगवादास इंद्रजी प्राच्यविद्या संशोधक, पहिले भारतीय पुरतत्त्वज्ञ यांचा जन्म.१८६१जेम्स नास्मिथ बास्केटबॉल खेळाचे निर्माते यांचा जन्म. (मृत्यू : २८ नोव्हेंबर १९३९)१८८० योशूसुका अकावा निसान मोटर कंपनीचे संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू : १३ फेब्रुवारी १९६७)१८९० बळवंत गणेश खापर्डे कविभूषण यांचा जन्म.१९०१ : श्री. के. क्षीरसागर जेष्ठ टीकाकार, समीक्षक विचारवंत यांचा जन्म. (मृत्यू : २९ एप्रिल १९८०)१९१५ दिनकर द. पाटील चित्रपट कथाकार, दिगदर्शक यांचा जन्म. (मृत्यू : २१ मार्च २००५)१९२६ : प्रभाकर नारायण पाध्ये पत्रकार,कथाकार,कादंबरीकार यांचा जन्म.१९२६ : झिग झॅगलर अमेरिकन लेखक यांचा जन्म. (मृत्यू : २८ नोव्हेंबर २०१२)१९६८ :यारी यांग याहू चे संस्थापक यांचा जन्म. मृत्यू :१७६१ :महाराणी ताराबाई भोसले मराठेशाहीतील प्रसिद्ध राजकारणी, मराठा साम्राज्यातील ४ थी छत्रपती यांचे निधन.१८३६ :चार्ल्स (दहावा) फ्रान्सचा राजा यांचे निधन. (जन्म : ९ ऑक्टोबर १७५७)१९८५ :संजीवकुमार प्रसिद्ध अभिनेते यांचे निधन. (जन्म : ९ जुलै १९३८) १९८७ : प्रा.भालबा केळकर मराठी रंगभूमीवरील अभिनेते,दिग्दर्शक, लेखक यांचे निधन. (जन्म : २३ सप्टेंबर १९९२ : जयराम शिलेदार संगीत रंगभूमीवरील गायक, अभिनेते यांचे पुणे इथे निधन. (जन्म : ६ डिसेंबर १९१६) १९९८ : अनंतराव कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन चे संस्थापक यांचे निधन. (जन्म : १९ सप्टेंबर १९१७)२००२ : वसंत कृष्ण वैद्य स्वत :च्या सुवाच्च अक्षरात हिंदीत राज्यघटना लिहिणारे यांचे निधन.२०१० :सिद्धार्थ शंकर रे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री यांचे निधन. (जन्म : २०

महाशब्दकोडे



आडवे संकेत

१) थोडक्यात २) लोक, प्रजा
४) इतर, गौण
७) वाद असलेला
८) बुद्धिभ्रंश ९) तीक्ष्ण धारेचे
११) हुल देणे
१४) एक मुसलमानी खिताब
१६) प्रसंगाला अनुसरुन
१९) वऱ्हाडी थांबण्याचे घर
२२) वल्लरी
२३) एक जात
२४) मी नाही त्यातली अन लावा आतली
२५) झाकण, आच्छादण
२६) एक औषधी
२७) कशा प्रकारचा
२९) पोल ३१) मेखला
३२) पायखाना
३३) एक खाद्य
३५) धावा
३७) गळा, सुर
३८) लातीखाली घालणे
४०) रथ हाकणारा
४२) साक्ष
४४) नवऱ्याची दुसरी पत्नी
४५) अवधी, उशीर
४६) सजविणे
४७) एका मुलीचे नाव
४८) नेहमी नाही म्हणणारा
४९) एक व पाव
५०) विमानात सेवा करणारी

उभे संकेत

१) निशाण, नेम
२) तारुण्य ३) मोठा प्रवाह
४) शेवट
५) पाताळातील एक नाग
६) काळाचा सुक्ष्म अंश
८) तेव्हा ब्रह्म पदी नाचे
१०) वाळलेली खजूर
१२) कपर्दिका
१३) मोठा दगड
१५) दमयंती
१६) पांघरुण
१७) पायखाना
१८) चक्कर, हेलपाटा
२०) तुट, हानी
२१) लहान कच्चा पुल
२४) नवा कोरा
२७) जास्त जळणे
२८) पिंजरा ३०) एक वाद्य, वेळू
३३) मदत, साह्य
३४) एक खाद्य
३६) पुढे पुढे
३९) नष्टप्राय स्थिती
४०) सावकाराचा धंदा
४१) धरबंद, मर्यादा
४३) धान्याचा ढीग
४४) सरकारचे शिक्कापत्र
४५) परिसर, घरासमोरील जागा
४६) इच्छा, आस्तीव
४७) पौष्टिक पदार्थ

मागील उत्तर

सु	सा	ट	■	ग	णि	त	शा	स्त्र	ज्ञ	■	■	■
पा	थ	र	का	र	■	प	■	■	■	म	■	जा
री	■	■	या	मि	नी	■	आ	म	ने	सा	म	ने
■	■	■	पा	■	■	■	म	■	म	ला	■	वा
म	स्त	वा	ल	■	थि	ऑ	स	फी	■	■	■	री
हा	व	र	ट	■	ग	■	भा	क	ड	क	था	■
का	न	स	■	क	ळ	स	■	ट	र	बु	ज	■
व्य	■	दा	■	म	■	न	वा	■	का	ल	■	स
■	सा	र	स्व	त	■	क	रं	ग	ळी	■	रा	म
प	थ	■	भा	र	ती	■	वा	र	■	स	व	य
रा	■	ने	व	ता	■	स	र	ग	म	■	■	सु
भु	गो	ल	■	■	भा	ल	■	री	स	■	का	च
त	री	■	र	म	त	ग	म	त	■	पा	ल	क



१) भारताचे १००० ते ५००० कि.मी. पल्ला असणारे क्षेपणास्त्र कोणते?
अ)अग्नी ब)राजेंद्र क)सूर्या ड)निशान

२) ७६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ कोणते?
अ)कराड ब)सोलापूर क)पुणे ड)इंदौर

३) २००२ सालचा नोबेल शांतता पुरस्कार कोणला मिळाला?
अ)जिमी कार्टर ब)कोफी अन्नान
क)दलाई लामा ड)यापैकी नाही

४) मुखर्जी आयोग कशासाठी नेमण्यात आलेला होता?
अ)इंदिरा गांधीची हत्या ब)राजीव गांधींची हत्या
क)महात्मा गांधींची हत्या ड)सुभाषचंद्र बोस यांचा मृत्यू

५) अंतराळात जाणारी पहिली खासगी व्यक्ती कोण?
अ)पीटर कॅरी ब) डॉ. श्रीराम रामास्वामी
क)डेनिस टिटो ड)एटीने मारु

६) महाराष्ट्र शासनाने २००२ चा 'लता मंगेशकर पुरस्कार'कोणाला दिला?
अ)आशा भोसले ब)श्रीनिवास फळे
क)श्री. सुधीर फडके ड) प्यारेलाल शर्मा

७) श्री हरिवंशराय बच्चन यांच्या काव्यसंग्रहाचे नाव काय?
अ)संगीतमाला ब) मधुशाला
क)परशाला ड) विश्वशाला

८) 'गोल्डन काड्रँगल' हे कशाशी संबंधित आहे?
अ) भूकंप प्रवण क्षेत्र ब) मादक द्रव्यांचा वापर
क) शेअर बाजाराचे सदृढीकरण
ड) राष्ट्रीय रस्ते विकास

९) 'द गोल' ही कोणत्या खेळाडूची आत्मकथा आहे?
अ) धनराज पिल्ले ब) कपिल देव
क) मेजर ध्यानचंद ड) राहुल द्रविड

१०) 'कोल्हाट्याचं पोर' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक कोणी लिहीले आहे?
अ) विजय काळ ब) भगवान सोनटक्के
क) लाखा कोल्हाटी ड)डॉ. किशोर शांताबाई काळे

११) महाराष्ट्रामध्ये भ्रष्टाचाराविरुद्ध कोण लढा देत आहे?
अ)अण्णा हजारे ब) गो.रा. खैरनार
क) मेधा पाटकर ड) बाबा आढाव

१२) जगातील पहिल्या मानवाचे अवशेष कोठे आढळले आहेत? अ)मलेशिया ब)स्वीडन
क)दक्षिण आफ्रिका ड) स्वित्झर्लंड

१३) 'कॉसमॉस' या विज्ञानविषयक पुस्तकाचे लेखक कोण? अ)आर्यर सी क्लार्क ब) कार्ल सेगन
क)मायकेल क्रायटन ड) हसाक असिमोव्हा

१४) ३३ वा आंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सव कोठे पार पडला?
अ) तिरुअनंतपुरम ब)हैद्राबाद
क) नवी दिल्ली ड) मुंबई

१५) २००२ साली ३२ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कोठे पार पडल्या?अ)इंफाळ ब)बेंगलोर
क)नवी दिल्ली ड) हैद्राबाद

१६) आंतरराष्ट्रीय सद्भावनेचा रेमन मॅगसेसे पुरस्कार कोणास मिळाला होता?
अ)जिमी कार्टर ब)संदीप पांडे
क)मेधा पाटकर ड) शांता सिन्हा

उत्तर: (१-क), (२-अ), (३-अ), (४-ड), (५-क), (६-ड), (७-ब), (८-क), (९-क), (१०-ड), (११-अ), (१२-क), (१३-ब), (१४-क), (१५-ड), (१६-ब)

जोक्स

व्याख्यानाच्या वेळी एक वक्ता भाषण करीत होता. त्याचं भाषणं काही लवकर संपेना. लोक कंटाळले. शेवटी भाषण संपल्यावर तो म्हणाला, 'माफ करा, माझ्याकडे घड्याळ नसल्याने किती वेळ गेला ते कळलंच नाही.'

तेव्हा एक श्रोता ओरडला. 'पण समोर भिंतीवर कॅलेंडर टांगलेल आहे ना, तारखा तरी बघायच्या!'



आडवे संकेत

१) फिरोग सिद्दीकी निर्देशित इस फिल्म में शरद कपूर और पुजा बत्रा थे.
४) इस फिल्म में सभी हिरो डुप्लीकेट थे.
८) करे ऐसा हो जाये मेरी... (गीत)
१०) संजय दत्त और सलमान खान अभिनीत एक फिल्म.
११) चंदन सी तवन धिरे से तेरा ये मुस्कुराना...(गीत)
१२) लो आ गई उनकी याद वो नही आये... यह लता दिदीने गाया हुआ गीत इस फिल्म का है.
१३) बॉबी (अभिनेता)
१४) पे दिल आ गया (फिल्म)
१५) का संगम (फिल्म)
१६) यहा अर्थ की आवश्यकता नही.
१७) जानम करो (फिल्म)
१९) आनंद (संगीतकार)
२०) सन् १९९७ में निर्माता निर्देशक रामगोपाल वर्मा की इस फिल्म में मनोज वाजपेयी और उर्मिला मातोंडकर थे.
२१) इस नाम की दो फिल्में बनी है. पहली में शम्मी कपूर तो दुसरी में अक्षय और करिश्मा कपूर थे.
२३) मै तो इक हु इस ख्वाब से तु प्यार ना कर... (गीत)
२४) बुटा बुटा साथ हमारे जाने रे... (गीत)
२६) मंगेशकर (गायीका)
२८) मस्ताना (फिल्म)
२९) एक मशहुर पॉप गायक.
३२) इस फिल्म में आमिर खान तिन बच्चों के मामा थे.
३३) हम तुम... युग युग से ये गीत केगाते रहेंगे... (गीत)

उभे संकेत

१) दादा इस फिल्म का अभिनेता.
२) विनोद चोपडा (निर्देशक)
३) मिथून चक्रवर्ती और रंजीता अभिनीत फिल्म तराना के निर्माता.
५) चुनरी प्यार की उडे आसमान में तेरे जैसा मेरे जैसा कोई साथी नही.... यह गीत इस फिल्म का है.
६) अनमोल इस फिल्म के निर्माता.
७) मायपित्याच्या सावलीतला काळ सुखाचा ओसरला (रमेश भाटकर, उदय टिकेकर, अलका कुबल की मराठी फिल्म.)
९) पुरी (खलनायक)
१२) चाहुंगा मै तुझे शाम सवेरे फिर भी कभी अब नाम को तेरे.... यह रफीजी ने गाया हुआ गीत इस फिल्म का है.
१४) इस फिल्म में अमिताभ बच्चन का डबल रोल था. और साथ में हेमा मालिनी, रंजीता और सचिन थे.
१६) अजनबी अजनबी तुम जाने पहचानेसे लगते हो... यह किशोरकुमारजी का गाया गीत इस फिल्म का है.
१८) मधु की एक फिल्म.
१९) राज बब्बर और रेखा अभिनीत फिल्म झुठी के संगीतकार.
२२) दिन नई रात (फिल्म)
२५) पहला (फिल्म)
२७) शेख (अभिनेता)
३०) माधुरी दीक्षीत, सलमान खान और संजय दत्त अभिनीत फिल्म.
३१)फिर दिल लाया हु (फिल्म)

फिल्मी शब्दकोडे

मागील फिल्मी उत्तर

कं	प	नी	■	■	सै	ला	ब	■	■	ज	मी	न
■	■	ल	■	■	नी	■	■	■	■	वा	■	ज
■	अ	म	र	अ	क	ब	र	ॲ	न्थो	नी	■	र
■	ज	■	■	म	■	■	क्ष	■	■	दि	ल	के
ना	य	क	■	री	■	■	क	■	■	वा	■	सा
■	दे	■	जो	श	■	अ	■	दा	मि	नी	■	म
प	व	न	■	पु	जा	भ	ट्ट	■	स्ट	■	जा	ने
■	ग	■	■	री	■	य	■	■	र	■	न	■
■	न	म	क	■	■	■	अ	ल	बे	ला	■	रा
स	■	■	र्ज	■	पां	ड	व	■	चा	ल	बा	ज
त्या	■	जा	■	■	■	■	ता	■	रा	■	■	नी
■	जा	न	पे	खे	ल	क	र	■	■	नै	■	ल
■	■	म	■	ल	■	मी	■	ख	ल	ना	य	क

दिवाळीनिमित्त भैरवनाथ पतसंस्थेच्या सभासदांना साखर व लाभांशचे वाटप



चेअरमन प्रल्हाद साठे

निमगाव गांगर्डा – कर्जत तालुक्यातील निमगांव गांगर्डा येथील भैरवनाथ पतसंस्थेच्या सभासदांना दिवाळीसाठी साखर वाटप व लाभांश वाटप पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रल्हाद साठे यांच्या हस्ते करण्यात आले. सभासदांना जवळपास अठरा क्विंटल साखर वाटप होईल. तसेच अकरा लाख रुपये लाभांशाचे वाटप होईल अशी माहिती पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन रघुनाथ गांगर्डे यांनी दिली.

याप्रसंगी पतसंस्थेचे संचालक शांताराम गांगर्डे, अशोक गांगर्डे, आसरा अनभुले, दादासाहेब अनभुले, विश्वनाथ झगडे, सुरेश काळे, ज्ञानदेव गांगर्डे, सुखदेव गांगर्डे, मारुती शेलार तसेच आनंदराव गांगर्डे, आबा गांगर्डे, पवन कर्डिले, नाना गांगर्डे, अशोक कर्डिले, विकास शेलार आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना प्रा. साठे यांनी कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा पगार बोनस दिला जाईल असे सांगितले. सर्वांची दिवाळी गोड व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करुन सर्व सभासदांना व सेवकांना दिपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

पतसंस्थेच्या सर्व सभासदांनी आपला लाभांश कार्यालयातून घेऊन जावा. तसेच साखरेचे कुपन घेऊन संस्थेने ज्या दुकानदारांना साखर वाटप करण्याचे सांगितले आहे; त्या दुकानातून साखर घेऊन जावी असे आवाहन संस्थेचे कार्यकारी संचालक बाळासाहेब साठे यांनी केले आहे.

शहर स्वच्छता कार्यात नागरिकांचे सहकार्य अपेक्षित

स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल यांचे प्रतिपादन; स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फाउंडेशनच्यावतीने रेल्वे स्टेशन परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप



स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनच्यावतीने रेल्वे स्टेशन परिसरातील मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप राजेंद्र सामल यांच्या हस्ते करण्यात आल

नगर – महानगरपालिका प्रशासनाकडून शहरात आरोग्य व स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. मात्र महापालिकेच्या दैनंदिन स्वच्छता कार्यामध्ये व उपक्रमांमध्ये नागरिकांचे सहकार्य व सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याचे प्रतिपादन रेल्वे स्टेशन परिसरातील स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल यांनी केले.

स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनच्यावतीने रेल्वे स्टेशन परिसरातील मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप राजेंद्र सामल यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संजीवनी कॉलनीचे सदस्य उद्योजक अशोक चुडीवाल, स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनचे महावीर ललवाणी, अभय ललवाणी, ऋषिकेश ललवाणी, मुकादम योगेश वाघमारे, विजय भोसले व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी अभय ललवाणी म्हणाले, महापालिका स्वच्छता कर्मचारी दररोज शहर परिसर स्वच्छ ठेवण्याचे कार्य करीत असतात. त्यामुळे आपल्या सर्वांचे आरोग्य निरोगी राहते. दिवाळी सणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दरवर्षी स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात येते. त्यामुळे महापालिका प्रशासन व नागरिक यांच्यात समन्वय निर्माण होतो. नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात सुलभता येते.

ललवाणी परिवाराच्यावतीने स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम हा कौतुकास्पद असल्याचे यावेळी स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल यांनी सांगितले.

शिक्षक होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन

करिअर कट्टाअंतर्गत डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये मारुती शेळके यांचे व्याख्यान



डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहिल्यानगर येथे करिअर कट्टाअंतर्गत विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यापन क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती मिळावी, तसेच शिक्षक पात्रता व भरती प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या विविध प्रवेश परीक्षांची प्रभावी तयारी करता यावी, या उद्देशाने सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहिल्यानगर येथे करिअर कट्टाअंतर्गत विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. "Preparation for Teaching Profession and Entrance Exams' (अध्यापन व्यवसाय आणि प्रवेश परीक्षांची तयारी) या विषयावर शेळके मास्टर माइंड अॅकॅडमीचे संचालक मारुती शेळके यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या व्याख्यानामध्ये मारुती शेळके यांनी शिक्षक होण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता, अध्यापन व्यवसायाचे स्वरूप, शिक्षक भरती प्रक्रियेतील विविध टप्पे आणि उपलब्ध करिअरच्या संधी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विशेषतः ढएढ, उढएढ व ढअखढ या महत्त्वपूर्ण परीक्षांचे स्वरूप, परीक्षेची पात्रता, प्रश्नपत्रिकेचा पॅटर्न, अभ्यासक्रम, गुणांकन पद्धती, तयारीचे नियोजन आणि उपयुक्त अध्ययन साहित्य याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

स्पर्धा परीक्षांची तयारी करताना अभ्यासाचे योग्य नियोजन, विषयानुसार वेळेचे व्यवस्थापन, नियमित सराव, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास आणि परीक्षेच्या स्वरूपानुसार तयारी करणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी परीक्षांकडे केवळ गुण मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता शिक्षक होण्याच्या ध्येयाकडे वाटचाल करण्याची संधी म्हणून पाहावे, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून होत असलेल्या शिक्षक भरतीच्या पार्श्वभूमीवर या व्याख्यानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. अध्यापन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील विविध प्रश्नांचे निरसन होण्यास या मार्गदर्शनाचा लाभ झाला. शिक्षक पात्रता परीक्षा आणि शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीच्या तयारीसाठी आवश्यक असलेली दिशा या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मिळाली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष विनय पाअुलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, संस्थेचे संचालक साई पाअुलबुधे, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, तज्ञ संचालक डॉ. रेखाराणी खुराना, रघुनाथ कारमपुरी, विनायक मच्चा, बी.एड. विभागाच्या प्राचार्य डॉ. प्राची मचे तसेच मास्टर माइंड शिष्यवृत्ती विभागाचे नवनाथ गिते, तांत्रिक विभाग प्रमुख मास्टर माइंड अॅकॅडमीचे सुरज घोगरे आणि डॉ. एन. जे. पाऊलबुधे रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे यांनी विशेष उपस्थिती दर्शविली. तसेच डॉ. एन. जे. पाअुलबुधे, डी.एड. विद्यालयाच्या प्राचार्य सविता सानप, डॉ. एन. जे. पाअुलबुधे, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य सुचित्रा डावरे, कार्यालयीन कर्मचारी आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. स्मिता चासकर यांनी केले. प्रा. अमृता रत्नपारखी यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. उज्वला आंबेडकर यांनी उपस्थित पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. अर्पणा केसकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी पूर्ततेसाठी प्रा. मृदुला गोरे, प्रा. संध्या यादव, प्रा. सविता पवार आणि प्रा. वसुधा देशपांडे यांनी सहकार्य केले.



आंतरराज्यीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत विजेतेपद मिळवून देणाऱ्या दिशान किशोर गांधी याचा गणपतीच्या आरतीनंतर सत्कार करण्यात आला.

गणपतीवरील श्रद्धा विशाल यश आणि बळ देते

संगमनाथ महाराज यांचे प्रतिपादन

नगर – नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती भक्तांची मनोकामना पूर्ण करणारा आहे. विशाल गणपतीवरील श्रद्धा भक्तांना मोठे यश आणि बळ देते. दिशान गांधी याचे कॉर्फबॉल खेळातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील देदीप्यमान यश या निस्सीम भक्तीचे व श्रद्धेचे उदाहरण आहे, असे कौतुकोद्गार माळीवाडा येथील श्री विशाल गणपती मंदिराचे मुख्य पुजारी संगमनाथ महाराज यांनी काढले.

देशातील पहिल्याच केपीएल मधील दिल्ली धुरंधर संघाच्या विजेतेपदात सिंहाचावाटा उचलल्यानंतर लगेचच झालेल्या आंतरराज्यीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत विजेतेपद मिळवून देणाऱ्या दिशान किशोर गांधी याचा गणपतीच्या आरतीनंतर सत्कार करण्यात आला. यावेळी संगमनाथ महाराज बोलत होते. नगरकरांचे आराध्य दैवत विशाल गणपतीची पूजा, आराधना आणि दर्शनाने भक्तांना निश्चितच फळ मिळते असे त्यांनी म्हटले.

देवस्थानचे सचिव व शहर सहकारी बँकेचे संचालक अशोक कानडे म्हणाले की, आमचे मित्र किशोर गांधी व परिवार पूर्वीपासून विशाल गणपतीचे भक्त आहेत. कॉर्फबॉल या अनोख्या खेळात दिशानने मिळवलेले यश नगरकरांसाठी अभिमानास्पद आहे. भविष्यातही तो आणखी मोठी भरारी घेईल यासाठी समस्त नगरकरांच्या शुभेच्छा त्याच्या पाठिशी आहेत. दिशान प्रत्येक स्पर्धेसाठी जाताना व परतल्यावर विशाल गणपतीचे मनोभावे दर्शन घेऊन आशीर्वाद व ऊर्जा घेतो. त्याच्या हस्ते अभिषेक पूजा व आरती करण्यात आली.

यावेळी विश्वस्त रंगनाथ फुलसौंदर, अशोक बाबर, गणेश राऊत, संजय मुनोत, किशोर गांधी, बबिता गांधी व भाविक उपस्थित होते.

अनाहत एक कलासृष्टी आयोजित 'द भक्ती बीट्स् भजन जॅमिंग अॅण्ड फ्युजन' कार्यक्रमाला प्रतिसाद







नगर – अनाहत एक कलासृष्टी आयोजित 'द भक्ती बीट्स 'भजन जॅमिंग अॅण्ड फ्युजन महावीर ग्रुप यांच्या विशेष सहकार्यातून, तसेच विचार भारती आणि समर्थ सत्संग परिवार यांच्या विशेष सहयोगातून या सांगीतिक सोहळ्याचे आयोजन माऊली सभागृह येथे करण्यात करण्यात आले होते. पारंपरिक भारतीय वाद्ये व पाश्चात्य वाद्ये यांचा सुंदर मिलाफ,भक्तिसंगीताचा आध्यात्मिक गंध, भक्तिरसाने ओथंबलेले शब्द आणि आधुनिक संगीताचा दमदार ठेका यांचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी अहिल्यानगरकरांना मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात 'आई गिरी नंदिनी' या देवीच्या भक्तिगीताने झाली. देवीला नमन करून सुरू झालेल्या या मैफलीत पुढे 'हनुमान चालीसा'च्या सादरीकरणाने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. 'मंगल भवन अमंगल हारी' या भगवान श्रीरामांच्या गीताने सभागृहात 'जय श्रीराम'चा जयघोष घुमला. 'राम नाम जप' या गीतालाही रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. 'वो कान्हा तेरी बासुरी' या गीतातून भगवान श्रीकृष्णाच्या बासरीचा सुरेल भावविश्व प्रेक्षकांसमोर उभे राहिले. 'ब्रज रस', 'अरे द्वारपालो', 'रामा रामा रटते रटते' आणि 'अवध में राम आए हैं' या गीतांनी रामभक्तीचा उत्कट आविष्कार घडविला. या सादरीकरणांदरम्यान अनेक रसिक मंत्रमुग्ध झाले, तर भक्तिगीतांच्या तालावर सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.'ऐसा डमरू बजाया भोलेनाथ ने' आणि 'नमो नमो जी शंकरा' या गीतांच्या सादरीकरणातून भगवान शंकराला संगीतमय वंदन करण्यात आले. त्यानंतर 'कीजो केसरी के लाल', 'श्रीराम जानकी', 'बघ उघडुनी दार' आणि 'हरी म्हणा तुम्ही' या गीतांनी कार्यक्रमात अधिक रंगत आणली.

समर्थभक्त मंदारबुवा रामदासी, आमदार संग्राम जगताप, उपमहापौर धनंजय जाधव, महावीर ग्रुपच्या विजयाताई भंडारी, चंदूकाका सराफचे गणेश निकम, साईदीप हिरोचे सुधीर चोपडा, नगरसेविका पुष्पाताई बोरुडे, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, अविनाश शिरापुरी, अनाहतचे प्रसाद सुवर्णपाठकी, प्रसाद बेडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दिपप्रज्वलन करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी समर्थभक्त मंदारबुवा रामदासी म्हणाले की, अनाहत एक कलासृष्टीने समाजात भक्तीचे विचार रुजविण्यासाठी मोठे धाडस दाखवत हा अभिनव कार्यक्रम आयोजित केला आहे. अशा सात्त्विक आणि संस्कारक्षम कार्यक्रमांना समाजातून पाठबळ मिळणे आवश्यक आहे. शरीरात देव, दानव आणि मानव या तिन्ही प्रवृत्ती असतात. मानवाकडून देवत्वाकडे जाण्याचा प्रवास या भक्तिसोहळ्यातून अनुभवता येतो. अनाहत नादाचा उंबरठा ओलांडून संगीताच्या माध्यमातून ईश्वराची अनुभूती घेता येते, असे त्यांनी सांगितले. या भक्तिमय उपक्रमाच्या पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात उमेशराज साळुंके, गणेश बैरागी, सौरभ साठे, गौरी रत्नपारखी, महेशराज साळुंके, ज्ञानेश्वर पाठक, विधान बैरागी, भावेश राणे, किर्तेश बाविस्कर, सागर वाघमारे, धनंजय गोहेर, अनिकेत साळुंके आणि यश फुलारे या गायक व वादकांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. प्रत्येक कलाकाराने आपल्या सादरीकरणातून भक्तिगीतांना वेगळी उंची दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी विविध दाखले, प्रसंग आणि भक्तिसंगीताशी संबंधित विचार मांडत प्रभावीपणे केले.

भक्तिसंगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि समृद्ध परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. पारंपरिक भजनांमधील भक्तिभाव, भावस्पर्शी शब्द आणि आध्यात्मिक ऊर्जा यांना आधुनिक संगीतशैलीची जोड देत नव्या पिढीला भारतीय भक्तिसंगीताशी जोडण्याचा अनोखा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

ओंकार देऊळगावकर, अॅड. आनंद कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, श्रेया सुवर्णपाठकी, अमृता बेडेकर, वैष्णवी कुलकर्णी, सोहम सौंदणकर, विनोद गरुड, बंटी ढोरे, अनुजा कुलकर्णी, गायत्री धनलगडे, गीतांजली सगम, अमित डोंगरे, जान्हवी देऊळगावकर, अनिकेत गोसावी, मोहिनी खोल्लम, सर्वेश खोल्लम यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास नगरसेवक कुमार वाकळे, डॉ. प्रकाश व सुधा कांकरिया, मनोज झंवर, विक्रम डीडवाणिया, हर्षद भावे, अविनाश देऊळगावकर, अशोक गांधी, विलास बडवे, चंद्रकांत पंडित, किशोर कुलकर्णी, राधिका सुवर्णपाठकी, अनघा पछाडे, अभिजित अपस्तंभ आदी उपस्थित होते.

दुष्काळाच्या झळा आता कवितेतून व्यक्त; नगरच्या काव्य लेखन स्पर्धेला प्रतिसाद

संदीप रासकर प्रथम, बाळासाहेब देशमुख द्वितीय, रुपचंद शिदोरे तृतीय



नगर – दुष्काळाची कारणे, त्याचे भीषण परिणाम आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याविषयी समाजात जनजागृती व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या काव्य लेखन स्पर्धेला जिल्ह्यातून प्रतिसाद लाभला. दुष्काळाच्या वेदना, पाणीटंचाईचे वास्तव आणि जलसंवर्धनाचे महत्त्व कवींनी आपल्या कवितांमधून प्रभावीपणे मांडले. या स्पर्धेत वाघुंडे (ता. पारनेर) येथील संदीप रासकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नवोदित कवींच्या लेखनकौशल्याला आणि काव्यप्रतिभेला व्यासपीठ मिळावे, तसेच साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर जनजागृती व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

स्पर्धेसाठी 'दुष्काळाची कारणे, घ्यावयाची खबरदारी' हा विषय देण्यात आला होता. यामध्ये दुष्काळामागील कारणे, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाणी बचतीचे महत्त्व अशा विविध विषयांवर कवींनी आपल्या भावना कवितेतून व्यक्त केल्या. जिल्ह्यातील अनेक कवींनी सहभाग नोंदवित दर्जेदार कविता सादर केल्या.

या स्पर्धेत संदीप रासकर (वाघुंडे, ता. पारनेर) यांनी प्रथम क्रमांक, त्र्यंबकराव ऊर्फ बाळासाहेब देशमुख (केडगाव) यांनी द्वितीय क्रमांक, तर रुपचंद शिदोरे (पाथर्डी) यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी अहिल्यानगर येथील धोंडीराम खांडेकर यांची निवड करण्यात आली.

स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना राज्यस्तरीय नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलन २०२६ मध्ये अनुक्रमे एक हजार, पाचशे आणि तीनशे रुपये रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेची माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.



वीरशैव कक्कय्या (ढोर) समाज विकास मंडळाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा शहरात उत्साहात पार पडला.

वीरशैव कक्कय्या समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्यास राज्यासह कर्नाटकातून प्रतिसाद

नगर – विवाहयोग्य युवक-युवतींना अनुरूप जीवनसाथी निवडण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच समाजातील एकोपा, संघटन आणि सामाजिक प्रगतीला चालना देण्याच्या उद्देशाने वीरशैव कक्कय्या (ढोर) समाज विकास मंडळाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा शहरात उत्साहात पार पडला. या मेळाव्याच्या निमित्ताने महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातील वीरशैव कक्कय्या समाजातील समाजबांधव व भगिनी एकत्र आले. विवाह जुळविण्याच्या सामाजिक उपक्रमासोबतच समाजाची एकजूट व विकासाचा संकल्प करण्यात आला.

शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात मंडळाचे अध्यक्ष रमेश त्रिमुखे यांच्या अध्यक्षतेखाली या राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्राम जगताप, आयएफएस (गुजरात) अधिकारी श्रीकांत केळगंद्रे, नगरसेविका रोशनी त्र्यंबके, पाथर्डी नगरपरिषदेचे नगरसेवक डॉ. जगदीश मुने, धनंजय कोकणे, हनुमंत सोनवणे, राधाकिसन त्रिंबके, वसंतराव केळगंद्रे, डॉ. पी. डी. सोनवणे, अशोक पाटेकर, बारामती नगरपरिषदेचे नगरसेवक सोमनाथ गजाकोष, परशुराम इंगोले, यशवंत नारायणकर, राजेश होटकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी वीरशैव कक्कय्या यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. या मेळाव्यास महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह कर्नाटक राज्यातूनही विवाहयोग्य युवक-युवती आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

आयएफएस अधिकारी श्रीकांत केळगंद्रे यांनी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाजबांधवांनी एकमेकांना सहकार्य करावे आणि एकजुटीने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन केले. समाजातील प्रत्येक घटकाने परस्परांना साथ दिल्यास सामाजिक आणि शैक्षणिक विकासाला अधिक गती मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

रमेश त्रिमुखे म्हणाले की, समाजातील युवा पिढीने उच्च शिक्षण घेण्याबरोबरच व्यवसायाभिमुख होऊन स्वतः च्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावा. शिक्षण, रोजगार आणि व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन साधणे ही काळाची गरज आहे. विवाहासाठी जीवनसाथी निवडताना केवळ रंग-वर्ण किंवा बाह्यरूपाला महत्त्व न देता व्यक्तिमत्त्वातील कला, गुण, स्वभाव आणि कर्तृत्वाला प्राधान्य द्यावे. तसेच वीरशैव कक्कय्या समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी राज्य सरकारने स्वतंत्र महामंडळाची स्थापना करावी. या मागणीसाठी संपूर्ण समाजाने एकत्र येऊन शासनदरबारी पाठपुरावा करण्याबरोबरच सरकारवर लोकशाही मार्गाने दबाव निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

मेळाव्यामध्ये विवाहयोग्य युवक-युवतींचा परिचय करून देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी निवृत्त तहसीलदार छाया चौधरी आणि अॅड. मनीषा केळगंद्रे यांनी पार पाडली. हा वधू-वर परिचय मेळावा यशस्वी करण्यासाठी भानुदास केळगंद्रे (बंडू मेजर), लाल त्र्यंबके, डॉ. राहुल त्रिमूखे, शनिधर त्र्यंबके, राजेंद्र त्र्यंबके, विकास त्रिंबके, छाया त्र्यंबके, रेश्मा त्र्यंबके, प्रकाश सोनटक्के, राजेंद्र सोनटटक्के उपाध्यक्ष बाबासाहेब त्रिंबके, सचिव प्रकाश कोकणे, गणेश नारायण, खजिनदार किशोर भालशंकर, अॅड. मनीषा शिंदे, कार्यकारणी सदस्य अनिल त्रिमुखे, प्रशांत डहाके, राजू कोकणे, संजय कवडे, संजय खरटमळ, ओमप्रकाश कवडे, डॉ. विद्याधर त्र्यंबके, प्रवीण त्र्यंबके, सुरेंद्रकुमार बोराडे, शशिकांत डहाके, गणेश शिंदे, सुभाष बोराडे, विनोद इंगळे, संतोष सोनटक्के, सतीश केळगंद्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.

उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर द्या; अन्यथा कारखान्यांतून साखर बाहेर पडू देणार नाही

केंद्रीय उच्चस्तरीय समितीसमोर अभिजीत पोटे यांची भूमिका; शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी



महाराष्ट्रातील साखर उद्योगासमोरील विविध प्रश्न, आर्थिक अडचणी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीची बैठक पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय), मांजरी बुद्रुक येथे पार पडली.

नगर – महाराष्ट्रातील साखर उद्योगासमोरील विविध प्रश्न, आर्थिक अडचणी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीची बैठक ४ नोव्हेंबर रोजी पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय), मांजरी बुद्रुक येथे पार पडली.

माजी नीती आयोग सदस्य तथा केंद्रीय उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष डॉ. रमेश चंद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी प्रतिनिधी अभिजीत पोटे यांनी शिवसेनेच्या वतीने सहभागी होत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि मागण्या मांडल्या.

साखर उद्योगाची सद्यस्थिती, कारखान्यांसमोरील आर्थिक अडचणी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारा दर आणि भविष्यातील धोरणात्मक उपाययोजना यांचा अभ्यास करून केंद्र शासनाला अहवाल सादर करण्याची जबाबदारी या समितीवर आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत राज्यातील शेतकरी प्रतिनिधी, साखर कारखाना क्षेत्रातील पदाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या भूमिका मांडल्या.

बैठकीत अभिजीत पोटे यांनी उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा, साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) प्रतिकिलो ५० ते ५५ रुपये करावी, इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७५ रुपये निश्चित करावा, तसेच साखर कारखान्यांमधील वजनकाटे ऑनलाइन करून वजन प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशा प्रमुख मागण्यांवर जोर दिला.

ऊस उत्पादनासाठी शेतकऱ्यांना करावा लागणारा वाढता उत्पादन खर्च, मजुरी, खते, औषधे, वाहतूक आणि इतर खर्चाचा विचार करता सध्याचे आर्थिक गणित शेतकऱ्यांना परवडणारे नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी प्रतिटन ५ हजार रुपये दर देण्याबाबत केंद्र शासनाने ठोस धोरण आखावे, अशी भूमिका पोटे यांनी मांडली.

या बैठकीस साखर आयुक्त संजय कोलते, साखर अर्थ विभागाचे आयुक्त यशवंत गिरी, अहिल्यानगर प्रादेशिक साखर संचालक गणेश पुरी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यापूर्वी मंत्रालयात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही शेतकऱ्यांच्या या मागण्यांवर चर्चा झाली होती. त्यानंतर आता केंद्रीय समितीसमोर प्रश्न मांडण्यात आल्याने शेतकरी वर्गाचे या बैठकीतील चर्चेकडे आणि समितीच्या आगामी अहवालाकडे लक्ष लागले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राज्य आणि केंद्र स्तरावर वाचा फोडण्यासाठी अभिजीत पोटे यांनी पुढाकार घेतला असून, शेतकऱ्यांच्या मागण्यांवर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष निर्णय घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळालाच पाहिजे. बैठकीत मांडलेल्या मागण्यांवर सकारात्मक विचार करून ठोस निर्णय घेतला नाही, तर साखर कारखान्यांमधून साखर बाहेर पडू देणार नाही आणि कोणालाही साखर विकू देणार नाही, असा इशारा अभिजीत पोटे यांनी दिला. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी वेळप्रसंगी तीव्र आंदोलन छेडण्याची भूमिका त्यांनी मांडली.

प्रेरणादायी अक्षरधन

आत्मबलाने शापाला सामोरे जा





शाप देणाऱ्याचेच वाटोळे होते. दुष्टपणा करणाऱ्याचा देह नष्ट होतो. जादूटोणा करणाऱ्यापासून भिण्याचे प्रयोजनच नाही. उलट आत्मबलाने त्या शापाला सामोरे जा व स्वतःची सर्व प्रकारे समृद्धी साधा.

वेदकाळापासून माणसाची प्रवृत्ती शिव्याशाप देण्याकडे दिसते. दुसऱ्याला ताप देतो, त्याचा संताप झालेला असतो. संताप दुःखदायकच. शारीरिक दुबळेपणामुळे जोर धरते, ते फक्त तोंडच. तेव्हा शाप हे दुबळ्या देहाचे व कमकुवत मनाचे बोथट शस्त्र. असल्या केवळ शब्दशूराचे कुणाला भय ? उलट लोक ठेवतात त्याला दूर. करून त्याची कीव. जो शाप देतो, त्याच्या मनाचा जळफळाट व अंत:करणाचा तळतळाट स्पष्ट दिसतो. पण हा मुक्तीचा व समृद्धीचा मार्ग नव्हे. झालेल्या किंवा होणाऱ्या दुःखापासून मुक्ती थोडीच मिळणार. शिव्याशाप देऊन ? उलट कमकुवतपणा भोवतो मनाला, संताप जाळतो देहाला.

एकनाथ महाराजांनी विंचवाचे रूपक करून क्रोधाविष्ट माणसाची असव्या स्पष्ट केली आहे.

अबबबबब विंचू चावला ।
काम क्रोधाचा विंचु चावला ।।
पंचप्राण व्याकुळ झाला ।
त्याने माझा प्राण चालिला ।।
सर्वांगाचा दाह झाला ।।

इच्छेविरुद्ध घडले, की क्रोध येतो. क्रोध हा विंचूच. तो प्राण व्याकुळ करतो. मग अंगाची आग होते. ती नाइलाजाने शिव्याशाप द्यायला भाग पाडते. समर्थ रामदास म्हणतात,

अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा।
अती होई तो सर्वदा दीनवाणा ।।

शाप देणाऱ्याजवळ सामर्थ्य हवे. अधिकार हवा. जगाला ताप देणाऱ्या दुष्ट दुर्जनांना शिक्षा व्हावी व जगाला सौख्यशांतीचा लाभ व्हावा या उद्देशानेच शाप दिलेला असावा. अशा वेळी समर्थांचा शाप अनर्थाचा नाश करेल. जगाला सुख लाभेल. अपराधी धडा शिकेल.

रामायण, महाभारत वगैरे वंदनीय ग्रंथातून वर्णिलेली शापवाणी. ही दुष्टांचे निर्दालन व इतरांना धाक बसवायचे साधन म्हणूनच भावते. ती समर्थ, अधिकारी व तपस्वी मुखातून उच्चारलेली असते. सामर्थ्याविना केवळ शिव्याशाप दिल्याने आपलेच तोंड दुखते व लोकांत हसे होते. काही लोक शिव्याशापासोबतच अघोरी मंत्रांचा वापर करून इतरांना भिववितात. पण ते अघोरी तंत्र त्यांनाच यातना देते, असह्य दुःखात खितपत पाडते. संत निळोबा म्हणतात,

काम्य निषिद्धी आदर थोर ।
जप ते अघोर मंत्रांचे ।।
निळा म्हणे यातना थोरी।।
नरकी अघोरी पडावया ।।।

वाईट हेतू व हावरट उद्देश बाळगून अघोरी मंत्राचे जप करीत दुसऱ्यावर शापाचे आघात करणारे स्वतःच यातनांचे अधिकारी होतात. भयानक दुःखात खितपत पडतात. म्हणूनच शिव्याशाप देणे व्यर्थ. उगाच शरीराला व मनाला शिणवण्यात काय अर्थ आत्मबलाने व्हा समर्थ, मग दुसरे दुष्ट न देतील तुम्हाला ताप व न घडेल तुमच्या हातून शाप देण्याचे पाप.

– किशोर गांधी



सावित्री फातिमा सद्भावना विचार मंचच्या वतीन २०२६ चा सद्भावना पुरस्कार प्रहार अॅकॅडमीचे नायब सुभेदार विनोदसिंह परदेशी यांना प्रदान करण्यात आला.

नायब सुभेदार विनोदसिंह परदेशी यांना सदभावना पुरस्कार प्रदान

नगर – सावित्री फातिमा सद्भावना विचार मंचच्या वतीन २०२६ चा सद्भावना पुरस्कार प्रहार अॅकॅडमीचे नायब सुभेदार विनोदसिंह परदेशी यांना प्रदान करण्यात आला. विनोदसिंह परदेशी कोणताही जातिभेद किंवा पक्षपात न करता अनेक विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षण देऊन देशसेवेसाठी तयार करण्याचे प्रशंसनीय कार्य करत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मंचाचे राज्य सचिव डॉ. रफीक पारनेरकर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक सब्बन, जिल्हा सचिव कॉ. फिरोज शेख, कोषाध्यक्ष राजुभाई शेख, सदस्य जैद खान, उमर शेख तसेच अॅकॅडमीचे शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दुष्काळग्रस्तांच्या सहाय्यतेसाठी शिवसेनेकडून हेल्पलाइन



महानगर प्रमुख किरण काळे यांच्या संकल्पनेतून शहर शिवसेनेच्या वतीने ग्रामीण भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी हेल्पलाइन सुरू करण्यात आल्याची घोषणा शिवसेनेचे नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केली.

नगर – राज्यसह अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती आहे. शेतकरी मोठ्या संकटाला सामोरा जात आहे. अशा काळामध्ये शिवसैनिकांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. महानगर प्रमुख किरण काळे यांच्या संकल्पनेतून शहर शिवसेनेच्या वतीने ग्रामीण भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी हेल्पलाइन सुरू करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले.

अहिल्यानगर शहरात आले असतात त्यांचे शहर शिवसेनेच्या वतीने शिवसैनिकांनी स्वागत केले. यावेळी ठाकरे बोलत होते. यावेळी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जिल्हा संपर्कप्रमुख आ. सुनील शिंदे, माजी नगरसेवक संजय झिंजे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, कामगार शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, रिपब्लिकन पार्टी ऑफ गवई गटाचे शहर प्रमुख सुशांत म्हस्के, विकास भिंगारदिवे, आकाश आल्हाट, राम वाणी, महिला आघाडीच्या उषाताई भगत, नलिनी गायकवाड, शैला लांडे, रत्नमाला वाणी आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी ठाकरे यांनी शिवसैनिकांशी अनौपचारिक संवाद साधत दुष्काळ जन्य परिस्थितीमध्ये जास्तीत जास्त मदत शेतकरी बांधवांना मदत करण्याबाबत शहर शिवसेनेच्या शिवसैनिकांना सूचना केल्या. यावेळी किरण काळे यांनी त्यांना उपक्रमाची माहिती दिली. ९०२८७२५३६८ या हेल्पलाइन क्रमांकाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शहर शिवसेना सहाय्य करणार आहे.

किरण काळे म्हणाले, अहिल्यानगर शहर हे जिल्हा मुख्यालय आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रशासकीय मदतीसाठी अनेक वेळा मुख्यालयी यावे लागते. मात्र बराच वेळेला अधिकारी, प्रशासन दात देत नाहीत. अशा प्रसंगात शहर शिवसेना शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्या ठिकाणी सज्ज असेल. शेतकरी हा बळीराजा आहे. तो जगला तर देश जगेल. या संकटाचा आपण एकजुटीने सामना करुयात असे काळे म्हणाले.

शेतकऱ्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा करण्याचे आदित्य ठाकरे यांना साकडे



अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतकरी, शेतमजूर व पशुधनासाठी शासनाकडून तातडीने मदत मिळवून देण्याबाबत शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांना जिल्हा प्रमुख राजेंद्र दळवी निवेदन दिले.

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात यंदा अत्यल्प पर्जन्यमानामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसमोर गंभीर दुष्काळी संकट उभे राहिले आहे. दुष्काळाच्या या संकटात शासनाकडून मिळणारी मदत अपुरी आणि विलंबाने मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे आपण जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला तातडीने दिलासा मिळवून देण्यासाठी शासनाकडे ठोस भूमिका मांडून शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख राजेंद्र दळवी यांनी शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

आदित्य ठाकरे हे नगर जिल्ह्याच्या दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आले असता हे निवेदन देण्यात आले. यावेळी तालुका प्रमुख नितीन कोतकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. या निवेदनात म्हटले आहे की, पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. अनेक भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, त्याच्यासमोर कुटुंबाचा उदरनिर्वाह, शेतीचा खर्च आणि जनावरांचे संगोपन करण्याचे मोठे आव्हान उभे आहे. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. पिकांचे नुकसान, घटलेले उत्पादन, वाढता कर्जाचा बोजा, हाताला काम नसल्याने शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. दुसरीकडे चारा टंचाईमुळे पशुधन जगविणेही कठीण होत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून सरसकट दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात, खरीप व रब्बी पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने भरीव आर्थिक मदत द्यावी, नुकसानभरपाई हेक्टरी किमान ५० हजार रुपये देण्यात यावी, शेतकऱ्यांचे पीककर्ज, मध्यम मुदतीचे व दीर्घ मुदतीचे कर्ज पुनर्गठित करून कर्जवसुलीला तात्पुरती स्थगिती द्यावी, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे वीजबिल माफ करावे. कृषिपंपांची वीजजोडणी खंडित करू नये, पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावांमध्ये तातडीने टँकर सुरू करून टँकरच्या फेऱ्या वाढवाव्यात. पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे, जनावरांसाठी चारा छावण्या तातडीने सुरू कराव्यात, पशुधनासाठी मोफत चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

मराठवाडीत एकाच वेळी आढळले दोन विषारी घोणस



तालुक्यातील मराठवाडी येथे एकाच वेळी दोन विषारी घोणस साप सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी पकडले.

नगर – तालुक्यातील मराठवाडी येथे एकाच वेळी दोन अत्यंत विषारी घोणस साप आढळून आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दोन्ही घोणस सापांना अत्यंत काळजीपूर्वक आणि सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर या दोन्ही सापांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

सध्या पावसाळ्यानंतरचे वातावरण आणि वाढते तापमान यामुळे साप मानवी वस्तीकडे येण्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्पमित्र बेरड यांनी नागरिकांना सापांबाबत महत्त्वाचे आवाहन केले आहे.

साप हा पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून निसर्गाचा समतोल राखण्यात त्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे साप दिसल्यास घाबरून जाऊ नये किंवा त्याला मारण्याचा प्रयत्न करू नये. सापापासून सुरक्षित अंतर ठेवावे आणि तातडीने प्रशिक्षित सर्पमित्र किंवा संबंधित वन्यजीव बचाव पथकाशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले. घोणससारखा अत्यंत विषारी साप मानवी वस्तीत आढळल्यास नागरिकांनी स्वतःहून त्याला पकडण्याचा प्रयत्न करू नये. घटनास्थळी गर्दी करू नये, परिसर सुरक्षित ठेवावा आणि प्रशिक्षित सर्पमित्रांना पाचारण करावे, असे आवाहन बेरड यांनी केले आहे.

गरजू चिमुकल्यांना दिवाळीनिमित्त नवीन शर्टचे वाटप करताना स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, एकनाथ जगताप.

दिवाळीनिमित्त स्नेहबंधतर्फे चिमुकल्यांना नवीन शर्टचे वाटप

नगर – दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गरजू कुटुंबांतील मुलांना सणाचा आनंद मनापासून घेता येत नाही. अशा वंचित मुलांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याच्या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने एमआयडीसी परिसरातील झोपडपट्टीतील गरीब व गरजू चिमुकल्यांना नवीन शर्टचे वाटप करण्यात आले. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या पुढाकाराने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी माजी प्राचार्य एकनाथ जगताप, प्रतीक डहाळे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते लहान मुलांना नवीन शर्टचे वाटप करण्यात आले. नवीन कपडे हातात मिळताच चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, त्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य आणि डोळ्यांतील चमक यामुळे दिवाळीचा खरा आनंद अनुभवायला मिळाला.

यावेळी डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, की दिवाळी हा आनंद वाटण्याचा आणि माणुसकी जपण्याचा सण आहे. आपल्या आजूबाजूला अनेक गरजू मुले आहेत, ज्यांना सणासुदीला नवीन कपडे घेणेही शक्य होत नाही. अशा मुलांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करणे, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे, हीच आमच्यासाठी खरी दिवाळी आहे. समाजातील प्रत्येक घटकाने वंचित आणि गरजू मुलांच्या आनंदासाठी पुढाकार घ्यावा. सणांचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता तो गरजूंपर्यंत पोहोचविला, तर माणुसकीचे नाते अधिक घट्ट होईल. सामाजिक बांधिलकी जपत स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून, गरजू आणि वंचित घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न यापुढेही सुरू राहणार असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

शिक्षणाधिकाऱ्यांना सन्मानचिन्ह प्रदान

अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित अहमदनगर हायस्कूल (मराठी माध्यम) आणि जकरीया आघाडी प्राथमिक शाळेच्या वतीने माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित अहमदनगर हायस्कूल (मराठी माध्यम) आणि जकरीया आघाडी प्राथमिक शाळेच्या वतीने माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा समाजकल्याण अधिकारी रफिक मुंशी यांच्या हस्ते श्रीमती गायकवाड यांना सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्राचार्या मेघना राजेंद्र कुलकर्णी आणि मुख्याध्यापिका शमीम पठाण उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका इशा तांबोळी यांनी केले. याप्रसंगी शिक्षणाधिकारी गायकवाड यांनी अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित शाळांना सदिच्छा भेट दिली व वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांमधील आपुलकी, शिस्त, आत्मविश्वास आणि एकमेकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. वसतिगृहातील वातावरणात विद्यार्थी अत्यंत आनंदाने, मोकळेपणाने आणि एकोप्याने राहत असल्याचे पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कुराण पठणाचेही त्यांनी विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या, प्रत्येक मूल हे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण असते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील हे गुण ओळखून त्यांना योग्य दिशा द्यावी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवावा. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक घेत असलेले परिश्रम आणि अहमदनगर यतीमखाना ट्रस्टचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान याबद्दल त्यांनी कौतुक केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील कौशल्याधारित शिक्षण, अनुभवाधारित अध्ययन, सर्जनशीलता आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

दूषित पाण्याचा प्रश्न सोडवून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा

नगरसेविका शितल ढोणे यांचे महापौर ज्योती गाडे, आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन

नगर– महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक दहामध्ये गेल्या सहा ते सात महिन्यांपासून नागरिकांना दूषित, पिवळसर, गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच प्रभागात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, बंद अवस्थेत असलेले सुलभ शौचालय तातडीने सुरू करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका शितल अजय ढोणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापौर ज्योती गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक दह्यातील झेंडीगेट परिसरातील ईदगाह मैदानामागे शितळादेवी मंदिराजवळ गेल्या सहा ते सात महिन्यांपासून नळाद्वारे अत्यंत दूषित, पिवळसर रंगाचे, गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे. या दूषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना पोटदुखी, उलट्या, जुलाब व ताप यांसारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. घाण पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, या समस्येबाबत ८ एप्रिल, ७ मे, १८ मे आणि ३० ऑक्टोबर रोजी आयुक्तांकडे लेखी निवेदने देण्यात आली आहेत. पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अनेकदा पाहणी करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.



प्रभाग क्रमांक दहामधील दूषित पाणी व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा यासाठी नगरसेविका शितल ढोणे यांनी महापौर ज्योती गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले. (छायाचित्र – लहू दळवी)

केवळ पाच मिनिटेच होतो पाणीपुरवठा

प्रभागातील जे.जे. गल्ली येथील आठ ते दहा घरांना मागील आठ ते दहा महिन्यांपासून केवळ पाच मिनिटे पाणीपुरवठा होत आहे. या ठिकाणापासून अवघ्या दहा फुटांच्या अंतरावर दुसरी पाणीपुरवठा करणारी पाइपलाइन असून, त्या पाइपलाइनला संबंधित भागातील पाणीपुरवठ्याची जोडणी दिल्यास पाणीपुरवठा सुरळीत होऊ शकतो, असे निवेदनात सुचविण्यात आले आहे. तसेच शेरकर गल्ली, बत्तीन बोळ आणि छोटी बेलदार गल्ली या भागांत अनेक दिवसांपासून पुरेसे पाणी येत नसल्याने नागरिकांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांवर विनाकारण आर्थिक भार पडत आहे. परिसरात स्वच्छ पाणी आणि पूर्ण दाबाने नियमित पाणीपुरवठा व्हावा, अशी मागणी नागरिकांकडून वारंवार केली जात असल्याचे नगरसेविका ढोणे यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

मोकाट कुत्र्यांचा त्रास वाढला

प्रभाग क्रमांक दह्यात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ही कुत्री लहान मुले, शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या अंगावर धावून जात असून, अनेकांना चावा घेतल्याच्या घटना दररोज घडत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. रात्रीच्या वेळी कुत्र्यांच्या सततच्या भुंकण्यामुळे नागरिकांची झोपमोड होत आहे. तसेच ही कुत्री कचरा पसरवून परिसरात अस्वच्छता निर्माण करीत आहेत. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या त्रासामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले असून, या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सुलभ शौचालय तातडीने सुरु करा

याशिवाय प्रभागातील बंद अवस्थेत असलेले सुलभ शौचालय नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने सुरू करण्यात यावे, अशीही मागणी नगरसेविका शितलताई ढोणे यांनी केली आहे. प्रभागातील दूषित पाणीपुरवठा, अपुरा पाणीपुरवठा, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त आणि बंद सुलभ शौचालय सुरू करण्याबाबत संबंधित विभागांना तातडीने योग्य आदेश देऊन नागरिकांच्या समस्या मार्गी लावाव्यात, अशी मागणी त्यांनी महापौर व आयुक्तांकडे केली आहे.



गुरुवाणी – १०२
ज्ञानसंपन्न, श्रद्धासंपन्न

यश अपयश हे भाग्य किंवा कर्मावर अवलंबून नसते. कर्म हे कच्चे मटेरियल असते. त्यापासून काय बनवायचे हे तुमच्या हातात असते. ते श्रद्धेने बनवले की नाही यावर सम्यकत्व ठरते. सम्यक होण्यासाठी २७ मार्ग आहेत. माझी सत्याशी निष्ठा असली पाहिजे. माझी अनुभूती, श्रद्धा जी आहे, त्यानुसारच मी कृती करेल, विचार करेल. मन, वचन, काया गुप्ति प्रशिक्षणानेच होते. मन गुप्ति म्हणजे आपल्या मनावर नियंत्रण असणे. यासाठी मनोबल प्राण श्वासोच्छ्वास प्राणाद्वारे साठवला पाहिजे. वचन गुप्ति म्हणजे आतील विकल्प नष्ट करणे. जीभ, कंठ, स्वरयंत्र संयमित केले पाहिजे. एक प्रयोग करा, जीभ उलटी करून ती टाळूला चिकटवा, मनात खूप फरक पडलेला जाणवेल. पूर्ण नर्व्हस सिस्टिमची अनुभूती घेणे ही जैन साधना आहे. काया गुप्ति साधनाही सरावाने येते. ही साधना साधल्यावरच तीर्थंकर चंडकौशिककडे गेले. त्याचे विष तीर्थंकरांच्या कायेनेच रोखले गेले. ही साधना खूप सरावाने येते. निरंतर अभ्यास लागतो. दुचाकी चालवताना बॅलन्स साधण्यासाठी सुरुवातीला प्रॅक्टिसच लागते. मनाची समाधारणा कशी करायची? एकलव्याने मनाची समाधारणा केली म्हणूनच गुरू प्रत्यक्ष समोर नसताना तो श्रेष्ठ धनुर्धर बनला. इमोशनमधील मिथ्यात्व संपुष्टात आला पाहिजे. परिवारातील एखाद्या सदस्याला घरी यायला उशीर होतो तेव्हा आपले मन वेगवेगळे विचार करते. 'मन चिंती ते वैरी न चिंती'. मनाची हीच धारणा बदलायची असते. बोलताना भाषा सुस्पष्ट असावी. बोलण्याचीही समाधारणा झाली तर समोरच्याला बोलणे व्यवस्थित कळते. काया म्हणजे बाह्य शरीराचीही समाधारणा आवश्यक असते. कसे बसायचे, कसे चालायचे, कसे उठायचे हे सुद्धा तुमचे चारित्र्य दर्शवते. पैशाच्या श्रीमंती सारखी ज्ञानाची श्रीमंती, समृद्धी असायला हवी. संत ज्ञानेश्वरांकडे ज्ञानाची श्रीमंती होती. चाणक्य ज्ञानसंपन्न होते. तुमच्याकडे समृद्ध ज्ञान असेल तर ज्ञानी व्हाल. श्रद्धासंपन्न व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत डिस्टर्ब होत नाहीत. वनवास पत्करावा लागला तरी श्रीराम डिस्टर्ब नाही झाले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या श्रद्धेत समृद्धी होती. औरंगजेबाने त्यांचे हालहाल केले पण संभाजीराजे डिस्टर्ब झाले नाहीत. चारित्र्य समृद्धी असेल तरच मोक्ष मिळतो. मनाची सुद्धा योग्य बांधणी करणे आवश्यक आहे. वाईट शब्द कानावर पडले तरी प्रतिक्रिया द्यायची नाही. पंचेंद्रियांची निग्रह साधना असते. डोळे, जीभ, कान सगळ्यांचा निग्रह करायला पाहिजे. जैन आगममध्ये क्रोधाची फिलिंगच न होण्यासाठी सूत्र आहे. अहंकार, क्रोधावर नियंत्रण आले तर जीवन मृदू होते.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करा

तीव्र पाणीटंचाई असलेल्या शहरातील भागांत तातडीने टँकर सुरू करण्याची नगरसेवक रवींद्र बारस्कर यांची मागणी

नगर–अल्प पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहर व उपनगरांतील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शहरातील सर्व प्रभागांमध्ये पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून ज्या भागांत तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे, त्या ठिकाणी तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. तसेच उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करून पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी महापौर ज्योती गाडे आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून तीव्र पाणीटंचाई असलेल्या शहरातील भागांत तातडीने टँकर सुरू करण्याची मागणी नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी महापौर ज्योती गाडे आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. (छायाचित्र – लहू दळवी)

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतही नगरसेवक बारस्कर यांनी शहर व उपनगरांतील तीव्र पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले. पाणीटंचाईचा गांभीर्याने विचार करून नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनात म्हटले आहे की, अल्प पर्जन्यमानामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, विविध परिसरांत तीव्र पाणीटंचाईची समस्या उद्भवत आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने धरणे, तलाव आणि इतर जलस्रोतांमधील पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. परिणामी, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापराच्या पाण्यासाठीही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

टंचाईग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करावी

अहिल्यानगर शहरातदेखील पाणीटंचाईची समस्या गंभीर होत असून, विविध भागांतील नागरिकांकडून पुरेशा प्रमाणात आणि नियमित पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. विशेषतः उन्हाळ्याच्या कालावधीत पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. पाणीपुरवठा अनियमित झाल्यास सर्वसामान्य नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने शहरातील सर्व प्रभागांतील पाणीपुरवठ्याचा आढावा घेऊन योग्य नियोजन करावे. ज्या भागांत पाणीटंचाई अधिक आहे, अशा परिसरांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करून सर्व भागांना योग्य प्रमाणात पाणी मिळेल, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी बारस्कर यांनी केली आहे.

जलवाहिन्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करावी

पाणीटंचाईवर उपाययोजना करताना पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करावी, पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच बंद असलेल्या विहिरी आणि बोअरवेलची पाहणी करून त्यांचा वापर करण्याबाबत कार्यवाही करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.याशिवाय ज्या भागांत नियमित पाणीपुरवठा करणे शक्य होत नाही, तेथे पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था निर्माण करावी. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेण्याची गरज असल्याचे बारस्कर यांनी म्हटले आहे.



आज दीपावलीचा पहिला दिवस. वसुबारसनिमित्त माणिकनगर येथील सोनल लोढा यांनी काढलेली आकर्षक रांगोळी.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा छावण्या सुरू करुन जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी

केडगावच्या पाणीप्रश्नासाठी नगरसेवक मनोज कोतकर यांनी धरले अधिकाऱ्यांचे पाय

नगर – शहरातील सर्वांत मोठे उपनगर असलेल्या केडगावमधील विस्कळीत पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करून त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थायी समितीचे माजी सभापती तथा नगरसेवक मनोज कोतकर यांनी केली आहे. नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे आक्रमक भूमिका घेत अधिकाऱ्यांचे पाय धरून लक्ष वेधले.



केडगावमधील विस्कळीत पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा अशी मागणी करत स्थायी समितीचे माजी सभापती तथा नगरसेवक मनोज कोतकर यांनी नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे आक्रमक भूमिका घेत अधिकाऱ्यांचे पाय धरून लक्ष वेधले. (छायाचित्र – लहू दळवी)

केडगाव हे अहिल्यानगर शहरातील सर्वांत मोठे उपनगर असून, या भागात मोठ्या प्रमाणात नागरिक वास्तव्यास आहेत. तसेच उपनगराचा नव्याने विस्तार होत असल्याने शेवटच्या घटकापर्यंत पाणी वितरण व्यवस्था पोहोचविणे आवश्यक आहे. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून केडगावमधील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, अनेक भागांत कमी दाबाने पाणी येत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. केडगावमध्ये नियमितपणे चार दिवसांनी पाणीपुरवठा होणे आवश्यक असून, त्यासाठी महापालिकेने योग्य नियोजन करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी कोतकर यांनी केली.

आतापासूनच नियोजन करणे गरजेचे

केडगाव उपनगरातील ज्या भागांमध्ये अद्याप पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइन पोहोचलेल्या नाहीत, त्या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आगामी काळातील पाणीटंचाईचा विचार करून महापालिकेने आतापासूनच नियोजन करणे गरजेचे आहे. नागरिकांना नियमित व पुरेशा दाबाने पाणी मिळेल, यासाठी वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवावे, असेही कोतकर यांनी नमूद केले.

पशुपालकांसमोर मोठे संकट उभे

केडगाव उपनगर महानगरपालिका हद्दीत असले तरी या भागात मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग वास्तव्यास आहे. अनेक शेतकरी शेतीबरोबरच जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करतात. मात्र, दुष्काळसदृश परिस्थितीमुळे चारा आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता कमी होत असल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने केडगाव उपनगरात चारा छावण्या सुरू करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करून शेतकरी व पशुपालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी मनोज कोतकर यांनी केली. केडगावमधील नागरिकांचा पाणीप्रश्न आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या पशुधनाच्या चारा–पाण्याचा प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने घेऊन तातडीने मार्गी लावावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

आशा सेविकांना महानगरपालिकेने २२ हजार रुपयांचे दिवाळी अनुदान द्या

नगर – नाशिक महापालिकेने आशा सेविकांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी २२ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान जाहीर केले आहे. त्याच धर्तीवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हद्दीत कार्यरत असलेल्या सुमारे १०० ते १२० आशा सेविकांनाही प्रत्येकी २२ हजार रुपयांचे दिवाळी सानुग्रह अनुदान अथवा बोनस मंजूर करावे, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा आशा कर्मचारी संघटनेच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे.



आशा सेविकांना २२ हजारांचे दिवाळी अनुदान द्यावे अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा आशा कर्मचारी संघटनेच्या वतीने महानगरपालिकेकडे करण्यात आली. उपमहापौर धनंजय जाधव यांना याबाबत निवेदन देण्यात आले.

यासंदर्भात उपमहापौर धनंजय जाधव यांनाही निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील आशा सेविका गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत तुटपुंज्या मानधनावर आरोग्यविषयक महत्त्वाची कामे प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. मात्र, शासनाकडून त्यांना कोणताही बोनस अथवा सानुग्रह अनुदान मिळत नाही. दुसरीकडे, महानगरपालिकेच्या इतर कर्मचाऱ्यांना दरवर्षी दिवाळीनिमित्त बोनस दिला जातो.

आशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती महापालिकेमार्फत करण्यात आलेली असून, गेल्या चार ते पाच वर्षांपासून त्यांचे मानधन शासनामार्फत दिले जात आहे. त्यामुळे आशा सेविकांना दिवाळी अनुदान दिल्यास महानगरपालिकेवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, असेही संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.

सध्या आशा सेविकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, दिवाळीसारखा महत्त्वाचा सण साजरा करण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची नितांत गरज आहे. नाशिक महानगरपालिकेने आशा कर्मचाऱ्यांना २२ हजार रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच धर्तीवर अहिल्यानगर महानगरपालिकेनेही आपल्या आशा सेविकांना सानुग्रह अनुदान, बोनस अथवा विशेष मदत मंजूर करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्तांनी या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने मंजुरी द्यावी, असे आवाहन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या निवेदनावर संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. सुधीर टोकेकर, स्वाती भणगे, सुरेखा भुजबळ तसेच जिल्हा उपाध्यक्ष कॉ. पैलवान सतीश पवार यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

साकळाई उपसा सिंचन योजनेचे भूमिपूजन करून तातडीने काम सुरू करा

अन्यथा १२ नोव्हेंबरपासून 'जनआंदोलन' आणि 'रास्ता रोको' करणार

दुष्काळामुळे शेतकरी व पशुपालक अडचणीत; चारा छावण्या, चारा डेपो किंवा अनुदान जाहीर करण्याची मागणी

नगर – जिरायती भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेला राज्य सरकारने मंजुरी देऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप योजनेच्या कामाचे भूमिपूजन झालेले नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिवाळीत भूमिपूजन करण्याचे जाहीर केले होते. त्यामुळे मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या शब्दानुसार तातडीने भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. तसेच दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी व पशुपालकांना दिलासा देण्यासाठी चारा छावण्या, चारा डेपो सुरू करावेत किंवा पशुधन वाचविण्यासाठी तातडीने अनुदान जाहीर करावे, अशी मागणी साकळाई योजना कृती समितीने केली आहे. या मागण्यांसाठी १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून हिवरे झरे, ता. नगर येथे जनआंदोलन आणि रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष बाबा महाराज झेंडे, गोवर्धन कार्ले, नारायण रोडे, सोमनाथ घाडगे आदी उपस्थित होते.

साकळाई उपसा जलसिंचन योजना जिरायती भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असून, या योजनेमुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. या योजनेला मंजुरी मिळावी, यासाठी साकळाई योजना कृती समितीच्या वतीने यापूर्वी जनआंदोलन उभारण्यात आले होते. या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारने योजनेला मंजुरी दिली. मात्र, मंजुरी मिळून सहा महिने उलटले तरी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.



साकळाई उपसा सिंचन योजनेचे भूमिपूजन करून तातडीने काम सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना देण्यात आले.

ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिवाळीत योजनेचे भूमिपूजन करण्यात येईल, असे जाहीर केले होते. त्यामुळे लाभधारक शेतकरी भूमिपूजनाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र, शासनदरबारी अद्याप कोणत्याही ठोस हालचाली दिसून येत नसल्याची नाराजी कृती समितीने निवेदनात व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या शब्दानुसार योजनेचे भूमिपूजन लवकरात लवकर जाहीर करून प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी जोरदार मागणी लाभधारक शेतकरी कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

भूमिपूजनाची तारीख जाहीर न झाल्यास १२ नोव्हेंबर पासून पुन्हा जनआंदोलन सुरू करण्यात येईल. या आंदोलनाची सुरुवात हिवरे झरे, ता. नगर, जि. अहिल्यानगर येथून रास्ता रोको करून करण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळी ९ वाजता आंदोलन सुरू होईल. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही समितीने दिला आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आणि पशुपालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पाण्याअभावी शेतीचे नुकसान होत असताना पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. पशुपालनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर जनावरांचे संगोपन करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू करावेत अथवा पशुधन वाचविण्यासाठी आवश्यक अनुदान जाहीर करावे, अशी मागणी कृती समितीने केली आहे.

शेतकरी आणि पशुपालकांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने तातडीने पुढाकार घेऊन आर्थिक मदतीचा हात द्यावा. साकळाई योजनेचे भूमिपूजन आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी चारा व अनुदानाच्या उपाययोजना या दोन्ही मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा नेत्याच्या विरोधात नसून, केवळ शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी असल्याचे कृती समितीने निवेदनात स्पष्ट केले आहे.

न्यू इंग्लिश स्कुलचा पाणीपुरवठा बंद; विद्यार्थ्यांचे हाल

शिक्षकांनी आ. अक्षय कर्डिले यांच्याकडे मागितली दाद

नगर – डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे समोर आले आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाकडून शाळेचा पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून, हा पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी शाळेच्या वतीने करण्यात आली आहे.



डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कुल शाळेचा पाणीपुरवठा ग्रामसेवकाने बंद केला असून यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी आमदार अक्षय कर्डिले यांना लेखी निवेदन दिले आहे.

यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी आ. अक्षय कर्डिले यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सुमारे २८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये बहुतांश विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर व विटभट्टी कामगार कुटुंबातील आहेत. पिण्याचे पाणी बंद करण्याचा असा कुठलाही नियम नाही.

शाळेला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात होता.मात्र, ग्रामपंचायतीने हा पाणीपुरवठा बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.शाळेतील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता पिण्याच्या पाण्याची सुविधा बंद करणे योग्य नसल्याचे शिक्षकांनी निवेदनात नमूद केले आहे.

विद्यार्थ्यांना शुद्ध व पुरेसे पाणी मिळणे आवश्यक असून, ग्रामपंचायतीने शाळेचा पाणीपुरवठा तातडीने पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आमदार अक्षय कर्डिले यांनी या प्रश्नात लक्ष घालून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाला सूचना द्याव्यात, अशी अपेक्षा शाळा प्रशासनाने व्यक्त केली आहे. आता आ. अक्षय कर्डिले या निवेदनाची दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा मार्गी लावतात, याकडे डोंगरगण ग्रामस्थ व पालकांचे लक्ष लागले आहे. पाणी पुरवठा पूर्ववत सुरु करण्यास सांगू असे आश्वासन आ. कर्डीले यांनी दिले आहे.

अहिल्यानगरनध्ये ६ नोव्हेंबरला ४५ उत्कृष्ट वादकांचा लाइव्ह ऑर्केस्ट्रासह रंगणार 'सुरेल संगीताची मैफल'

आलोक काटदरे, गुल सक्सेना व सिने अभिनेत्री पल्लवी वैद्य यांच्यासह ४ गायकांचे सादरीकरण



नगर – नगरमध्ये ६ नोव्हेंबर रोजी संगीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दमन काशीद हॉस्पिटल प्रस्तुत हा कार्यक्रम शुक्रवारी सायंकाळी ७.४५ वाजता सहकार सभागृह, अहिल्यानगर येथे रंगणार आहे. या कार्यक्रमात भारतातील पार्श्वगायक जोडी आलोक काटदरे आणि गुल सक्सेना यांच्यासह डॉ. दमण काशीद व डॉ.गायत्री हे चार गायक आपल्या आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेत्री पल्लवी वैद्य हे उपस्थित राहणार आहेत.

या संगीत मैफलीचे खास आकर्षण म्हणजे तब्बल ४५ उत्कृष्ट वादकांचा लाइव्ह ऑर्केस्ट्रा, दर्जेदार संगीत, अप्रतिम गायन व वाद्यवृंदाच्या साथीने ही मैफल अविस्मरणीय ठरणार आहे.

या कार्यक्रमासाठी तिकिटांना रसिकांचा प्रतिसाद मिळत असून, एकूण १००० तिकिटांपैकी केवळ १०० ते १५० तिकिटे शिल्लक असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे हा कार्यक्रम लवकरच हाऊसफुल्ल होण्याची शक्यता आहे.

संगीतप्रेमींनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता आपली तिकिटे बुक माय शोच्या माध्यमातून ऑनलाइन आरक्षित करावीत. अधिक माहितीसाठी ज्ञानेश्वर माने ८९५६३ ६३६६८ किंवा डॉ.दमन काशीद ९९७०० ५४६९१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



सुरों का सफर संगीत मैफिलीला नगरकरांची उत्स्फूर्त दाद. (छायाचित्र – समीर मन्यार)

सुरों का सफर संगीत मैफिलीला नगरकरांची उत्स्फूर्त दाद

नगर– गझल, सुफी, चित्रपट संगीत आणि शास्त्रीय गीतांच्या सुरेल आविष्काराने अहिल्यानगरमधील संगीतप्रेमी रसिकांना मंत्रमुग्ध करणारी सुरों का सफर ही संगीत मैफल उत्साहात झाली. गायकांच्या भावपूर्ण सादरीकरणाला रसिक श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि भरभरून दाद देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संगीताच्या माध्यमातून आनंदाची अनुभूती देतानाच दिव्यांग बांधवांच्या मदतीचा सामाजिक संदेश दिला. नेत्रतज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर यांच्या सहकार्याने चिटगोपेकर व्हेंचर्सच्या द मेलडी मंदिर प्रॉडक्शन्सतर्फे आर.सी. इंटिग्रिटी आणि द ड्युओ क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मैफिलीमध्ये गायिका गीता कुलकर्णी, गायक प्रल्हाद जाधव आणि गिरिराज जाधव यांनी आपल्या सुरेल आवाजातून विविध लोकप्रिय गीतांचा नजराणा सादर केला. गुलाम अली, जगजीत सिंह, मेहंदी हसन, लता मंगेशकर, किशोरकुमार, आशा भोसले आणि पंकज उदास यांसारख्या दिग्गज गायकांच्या अजरामर गीतांची आणि गझलांची मैफल रंगली. जुन्या हिंदी चित्रपट गीतांपासून भावस्पर्शी गझलांपर्यंत विविध संगीत प्रकारांचा आनंद रसिकांना अनुभवला. गायकांच्या सुरेल गायनातून गीतांमधील भाव, शब्दांची ताकद आणि संगीताची जादू उलगडली. रसिकांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांना दाद दिली. गझल गायनाच्या सादरीकरणाने वातावरण भावमय झाले. संगीतप्रेमींच्या प्रतिसादामुळे संपूर्ण कार्यक्रमाला रंगत आली.

संगीत ही केवळ मनोरंजनाची कला नसून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचे प्रभावी माध्यम आहे, हा विचार या कार्यक्रमातून देण्यात आला. या माध्यमातून संकलित होणारी मदत दिवाळीनिमित्त दिव्यांग बांधवांना देण्यात येणार असल्याचे आयोजक डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी सांगितले. सुरेल संगीत, भावपूर्ण गझला, लोकप्रिय गीतांचा ठेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधणारी ही मैफल नगरकर रसिकांसाठी संस्मरणीय ठरली. संगीताच्या आनंदासोबतच दिव्यांग बांधवांच्या मदतीचा संवेदनशील संदेश देत सुरों का सफर या कार्यक्रमाने सामाजिक बांधिलकी जपली.

गायक कलाकारांचा यावेळी चिटकोपेकर परिवाराच्या वतीने स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या मैफिलीमध्ये भारतीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते ही भारतीय बैठक रसिकांचे आकर्षण ठरले. निवेदन डॉ. स्मिता भुसे यांनी केले. आयोजक डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी आभार मानले.

राम एजन्सीचा ४९ वर्षांचा यशस्वी प्रवास

इलेक्ट्रॉनिक्स वस्तूसाठी खरेदीचे नगरकरांचे विश्वासार्ह ठिकाण



इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये गेली ४९ वर्षांपासून राम एजन्सीने लोकांचा आनंद द्विगुणित करण्याचे काम केले आहे.

नगर – इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये गेली ४९ वर्षांपासून राम एजन्सीने लोकांचा आनंद द्विगुणित करण्याचे काम केले आहे. एलइडी टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन, मायक्रोओव्हन, एसी, मोबाईल, लॅपटॉप, होम थेटर, याचबरोबर इलेक्ट्रॉनिक वस्तूचे अधिकृत डिस्ट्रीब्यूटर म्हणून राम एजन्सीचे नाव आहे. दिवाळी सणाचा आनंद व्दिगुणित करण्यासाठी ग्राहक इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदीसाठी राम एजन्सीला प्राधान्य देत असल्याचे चित्र नगरच्या बाजारपेठेत दिसून येत आहे.

दिवाळीनिमित्त राम एजन्सीमध्ये भरपूर ऑफरही आहे. तसेच प्रत्येक खरेदीवर विशेष डिस्काउंट आणि वेगवेगळ्या कंपन्याच्या तात्काळ फायनान्स सुविधाही उपलब्ध आहेत. कॅशबॅक ऑफर, क्रेडिट कार्डद्वारे पेमेंट, सेम डे डिलिव्हरी तसेच विविध खरेदी योजनांचा लाभ घेता येतो. ग्राहकांनी वस्तू खरेदीसाठी राम एजन्सीच्या शॉपला भेट दिल्यानंतर वस्तूंच्या अनेक व्हरायटीज बघायला मिळतात. ग्राहकांचा विश्वास, दर्जेदार उत्पादने आणि उत्कृष्ट सेवांच्या बळावर नगर जिल्ह्यात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारी राम एजन्सी यशस्वी वाटचाल करत असून, नगर शहरात नवी पेठ, सावेडी आणि मार्केट यार्ड अशा तीन प्रमुख ठिकाणी भव्य शोरूम्स आहे.

राम एजन्सीची खरेदी अधिकृतरित्या डायरेक्ट कंपनीकडून होते. त्यामुळे शोरूम्समध्ये फर्स्ट क्लास क्वालिटीच्या वस्तू उपलब्ध असतात, जेणेकरून ग्राहकांना दीर्घकाळ सर्विस देण्यास सोयीस्कर होते. त्यामुळे ग्राहकांचे समाधान होते राम एजन्सी मध्ये कुठल्याही प्रकारच्या दुय्यम वस्तू किंवा माल विकला जात नाही. ग्राहकांना विविध नामांकित ब्रँडची उत्पादने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ग्राहकांच्या अडचणींचे त्वरित निराकरण आणि सेवेत सातत्य राखण्यामुळे राम एजन्सीने ग्राहकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. आणि म्हणूनच गेली ४९ वर्षात बाजारपेठेत बरेच बदल झाले असूनही सातत्याने टिकून राहून आम्ही असंख्य ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरलो आहोत.

४९ वर्षांचा हा प्रवास म्हणजे दीर्घकाळ खरेदी करून ग्राहकांनी दाखवलेला विश्वास, प्रेम आणि सहकार्य यांची पावती आहे. बदलत्या तंत्रज्ञानासोबत आधुनिक उत्पादने आणि उत्तम सेवा देण्याचा राम एजन्सीचा प्रयत्न भविष्यातही असाच सुरू राहणार आहे.

राम एजन्सीचे नगर जिल्ह्यात तालुकानिहाय वितरकांचे जाळे असून, ग्राहकास खरेदी सुलभ करण्याचा सातत्याने प्रयत्न केला असल्याचे, संचालक राम मेघांनी यांनी सांगितले.

न्यायाधीश व वकिलांनी हृदय तपासणीस तारीख पे तारीख घेऊ नये

प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांचे आवाहन; रोटरी क्लब मिडटाऊन, सेन्ट्रल बार असोसिएशन व इंपल्स प्लस हॉस्पिटलचे आयोजन

नगर – न्यायालयीन काम काजाचा मोठा ताण न्यायाधीश व वकीलांवर पडत आहे. यामुळे अनेकांना शुगर, बिपी व हृदयाचे आजार जडत आहेत. या आजारावर वेळीच उपचार सुरु झालेतर पुढील संभाव्य धोका टळू शकतो. म्हणून न्यायाधीश व वकिलांनी हृदय तपासणीस तारीख पे तारीख न घेता तातडीने तपासणी करावी, असे आवाहन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी करून रोटरी क्लब मिडटाऊनच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.



जिल्हा न्यायालयात आयोजित न्यायाधीश व वकीलांच्या मोफत हृदय आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांची रक्तदाबाची तपासणी करतना डॉ.संदीप गाडे. यावेळी जिल्हा न्यायाधीश राजेश गुप्ता, ॲड. फारुक शेख, ॲड. हेमंत कराळे, मधुर बागायत, डॉ. विक्रम पानसंबळ व डॉ.रविकांत पाचारणे आदी.

अहिल्यानगरच्या रोटरी क्लब मिडटाऊन, सेन्ट्रल बार असोसिएशन व इंपल्स प्लस हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालयात न्यायाधीश व वकील सदस्यांसाठी घेण्यात आलेल्या मोफत हृदय आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांच्या आरोग्य तपासणीने झाले. यावेळी जिल्हा न्यायाधीश राजेश गुप्ता, अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. फारुक शेख, रोटरी क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष ॲड. हेमंत कराळे, सचिव मधुर बागायत, इंपल्स प्लस हॉस्पिटलचे संचालक डॉ. संदीप गाडे, मेडिकल डायरेक्टर डॉ. विक्रम पानसंबळ आदींसह रोटरी क्लबचे, वकील संघटनेचे सदस्य व न्यायिक अधिकारी उपस्थित होते.

डॉ. संदीप गाडे म्हणाले, कुठलाही आजार अचानक होत नाही तर त्याची सुरवात बऱ्याच वर्षांआधी झालेली असते. सर्वांनी जर नित्याने स्वतःसह कुटुंबातील सदस्यांची आरोग्य तपासणी केल्यास या मोठ्या आजारांवर मात करता येते, असे सांगून हार्टअटॅकच्या प्राथमिक उपचारांची माहिती दिली.

प्रताविकात ॲड. हेमंत कराळे म्हणाले, न्यायदानाच्या पवित्र कार्यात व्याघ्र असलेल्या न्यायाधीश आणि वकिलांच्या हृदयाची काळजी घेण्यासाठी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊनने या उपक्रमाचे आयोजन केले आहे. हे आरोग्य तपासणी शिबीर हृदयापासून हृदयापर्यंत पोहोचणारा एक जिव्हाळ्याचा उपक्रम आहे. या शिबिरात हृदयाच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाच्या तपासण्या, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि हृदयविकारापासून बचावा बाबत जागृती करण्यात आली. यासाठी सेन्ट्रल बार असोसिएशन व इंपल्स प्लस हॉस्पिटलनेर सहकार्य केले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटरी क्लबचे सचिव मधुर बागायत यांनी आभार मानले. यावेळी रोटरी क्लबच्या सदस्या ॲड. वैशाली कराळे, मार्लिन एलिषा, नीलिमा देशपांडे, प्रशांत अमरापूरकर, अभिजीत जाधव, आदिती पानसंबळ, महेश गोपालकृष्णन यांच्यासह सेंट्रल बार असोसिएशनचे सचिव ॲड. अभिषेक देशपांडे, ॲड. सौरभ काकडे, डॉ.रविकांत पाचारणे यांच्यासह वकील सदस्य उपस्थित होते.



वर्धमान महावीर स्कूलमध्ये 'दिवाळी कार्निव्हल' उत्साहात साजरा झाला.

वर्धमान महावीर स्कूलमध्ये 'दिवाळी कार्निव्हल' उत्साहात साजरा

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित वर्धमान महावीर स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी दिवाळी उत्सवाचा आनंद लुटला. दोन दिवसीय दिवाळी कार्निव्हलचा शुभारंभ दीपप्रज्वलनाने झाला. यावेळी प्राचार्या रेणुका जोशी, केदार वाळिंबे, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, निखिलेंद्र लोढा, बाबूशेठ लोढा, माणिकचंद कटारिया, सुनील मालू आदी उपस्थित होते.

नगर – कल्याण रोडवरील वर्धमान महावीर शैक्षणिक संकुलात प्राथमिक स्कूल, नर्सिंग कॉलेज सुरू आहे. दिवाळीचा सर्वांनी एकत्रित आनंद घ्यावा यासाठी या दिवाळी कार्निव्हल आयोजन करण्यात आले होते. कार्निव्हलमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कठपुतळी शोद्वारे दिवाळीचे धार्मिक, सांस्कृतिक महत्त्व, परंपरा यांचे सुंदर सादरीकरण करण्यात आले. मुलामुलींनी महाराष्ट्राची ऐतिहासिक ओळख असलेल्या गड किल्ल्यांच्या प्रतिकृती बनवून आपला देदीप्यमान इतिहासाची उजळणी केली. कार्निव्हलमध्ये दिवाळीशी संबंधित परंपरांची माहिती देण्यात आली. दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी पणत्या सजवणे, शुभ–लाभ तयार करणे, रांगोळी काढणे अशा कलात्मक उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. कार्निव्हलच्या निमित्ताने संध्याकाळी भजन संध्येचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच विद्यार्थ्यांनी विविध खेळांचे व खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थी, पालक, शिक्षकांनी दोन्ही दिवस कार्निव्हलमध्ये सहभाग घेऊन उत्सवाचा आनंद लुटला व एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. परंपरा, संस्कृती, सर्जनशीलता आणि आनंद यांचा सुंदर संगम असलेला हा दोन दिवसीय दिवाळी कार्निव्हल विद्यार्थ्यांसह पालकांसाठीही अविस्मरणीय ठरला. संपूर्ण कार्यक्रम उत्साहात आणि आनंदात झाला.

खुर्चीलाट्यांनो, तुकाराम मुंढांच्या बाण्याचे 'नख' भरण्याचीही तुमची औकात नाही!

पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेचा आरोप; अहिल्यानगरमध्ये ६ नोव्हेंबरला रणशिंग फुंकणार

नगर – सत्तेच्या माजात धुंद झालेल्या आणि लाल दिव्यांच्या गाड्यांमध्ये घोरणाऱ्या सुस्त प्रशासनाला सळो की पळो करून सोडण्यासाठी अहिल्यानगरची धूळ उडणार आहे! जगभर दीपोत्सवाचा उत्सव सुरू असताना, दुसरीकडे 'पीपल्स हेल्पलाईन' आणि 'भारतीय जनसंसद' या संघटनांच्या वतीने व्यवस्थेच्या छाताडावर पाय ठेवत आक्रमक आणि बंडखोरीची हाक देणारा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

६ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगरच्या हुतात्मा स्मारकात, देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यासह शासन–प्रशासनातील तमाम पदाधिकाऱ्यांना ज्येष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कर्तव्यनिष्ठेच्या नखाची प्रतिकृती प्रतीकात्मक 'दिवाळी भेट' म्हणून जाहीरपणे सुपूर्द केली जाणार आहे. महाराष्ट्राच्या मातीत बाणा दाखवणारा हा अधिकारी जेव्हा नवी मुंबईत महापालिका आयुक्त म्हणून रुजू होतो, तेव्हा तो 'वॉक विथ कमिशनर'च्या माध्यमातून एसी कार्यालयातून बाहेर पडून थेट रस्त्यावर उतरतो आणि सामान्य माणसाचे अश्रू पुसतो. स्वातंत्र्योत्तर भारतातील प्रशासनात अशी लोकाभिमुखता आणि उत्तरदायित्वाची भावना आज पूर्णपणे हद्दपार झाली असून, आजची नोकरशाही आणि राज्यकर्ते म्हणजे फक्त सत्तेचे गुलाम बनले आहेत, असा प्रखर रोष दोन्ही संघटनांनी व्यक्त केला आहे.

तुकाराम मुंढे यांच्यासारख्या कर्तव्यकठोर अधिकाऱ्याच्या नखाची सरही आजच्या एकाही पदाधिकाऱ्याला किंवा राज्यकर्त्याला आलेली नाही, असा घणाघात करत आयोजकांनी प्रशासनाला उघडे पाडले आहे. पदाधिकाऱ्यांनी खुर्च्यांचे लाचार होण्यापेक्षा मुंढे यांच्या कार्यपद्धतीतून धडा घ्यावा, जनतेच्या हाकेला धावून जावे, वेळेत न्याय द्यावा आणि कायदा केवळ गरिबांसाठी नव्हे तर सर्वांसाठी समानतेने राबवावा, असे ठणकावून सांगण्यात आले आहे.

आयुष्य अगदी अल्प आहे; ते सत्तेची खाती भरण्यात घालवण्यापेक्षा लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, घटनात्मक नैतिकता आणि कायद्याचे राज्य या पाच तत्त्वांच्या आधारावर जनसेवेसाठी समर्पित करा, अशी मशाल पेटवणारी हाक या निमित्ताने संपूर्ण देशाच्या व्यवस्थेला दिली जाणार आहे! या अभिनव आंदोलनासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, शाहीर कान्हू सुंबे, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले आदी प्रयत्नशील आहेत.

आजबे कुटुंबियांकडून ॲम्बुलन्सचे लोकार्पण

निंबळक – विवाह समारंभासाठी नागपूरकडे जात असताना समृद्धी महामार्गावर अकोलाजवळ झालेल्या अपघातात एमआयडीसी, नवनागापूर येथील विवेक संतोष आजबे (वय १७) याचा मृत्यू २७ मे २०२५ रोजी झाला. पहाटे हा अपघात झाला होता. मृत विवेक हा त्याच्या चुलत भावाच्या विवाह समारंभासाठी नागपूरला जात होता. समृद्धी महामार्गावरून प्रवास करीत असताना अकोला जवळ शेलूबाजार येथे पहाटेच्या सुमारास गाडीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन दुभाजकावर आदळले. या अपघातात तिघे जखमी झाले, मात्र विवेक हा गंभीर जखमी झाला होता. अपघात झाल्यानंतर विवेकचे वडील संतोष आजबे यांनी १०८ क्रमांकावर रुग्णवाहिकेसाठी संपर्क केला. मात्र, दोन ते अडीच तास उलटूनही रुग्णवाहिका पोहोचली नाही. आजबे यांच्या कुटुंबीयांचे दुसरे वाहन मागे होते. या वाहनातून जखमी विवेकला अकोला येथे खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तोपर्यंत त्याचे निधन झाले होते. या प्रवासात मिळालेल्या शेलुबाजार प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या आवारात रुग्णवाहिका आढळली, मात्र ती रुग्णवाहिका बंद असल्याचे सांगण्यात आले. तसेच पर्यायी रुग्णवाहिकाही उपलब्ध झाली नाही. अर्ध्या तासात रुग्णवाहिका पोहोचली असती तर मुलाचा जीव वाचला असता, असे आजबे यांनी सांगितले.



कै.विवेक आजबे यांच्या स्मरणार्थ मातोश्री ॲम्बुलन्स सर्विस अशी नवीन ॲम्बुलन्सचे लोकार्पण केले. (छायाचित्र – संदीप बांगर)

कै.विवेक आजबे याचा १८ वा वाढदिवस असल्या कारणाने कुटुंबीयांनी त्याच्या स्मरणार्थ मातोश्री ॲम्बुलन्स सर्विस अशी नवीन ॲम्बुलन्स चे लोकार्पण केले. आपल्या एकुलत्या मुलावर जो प्रसंग ओढावला तो प्रसंग इतर कुटुंबातील कोणावरही ओढवू नये, ताबडतोब ॲम्बुलन्स मिळावी हा त्या मागे उदात्त हेतू आहे. संतोष आजबे हे ड्रायव्हर असून आई शिवणकाम करते. आजोबा महादेव आजबे तथा अण्णा हे आध्यात्मिक क्षेत्रात काम करतात. नातवाच्या आकस्मित मृत्यूच्या धक्क्याने त्याची आजी जनाबाई आजबे यांचे सुद्धा वयाच्या ५८ व्या वर्षी नातवाच्या तीव्र आठवणीतून मागील पंधरवड्यात आकस्मिक निधन झाले. या दुःखातून सावरत वडील संतोष आजबे व चुलते माऊली आजबे यांनी ॲम्बुलन्स चे लोकार्पण केले. या प्रसंगी नवनागापूर येथील विवेकचे मित्र, मराठा मोर्चाचे सर्व सदस्य, आदर्श मित्र मंडळ, आमदार काशिनाथ दाते यांचे चिरंजीव दिलीप दाते, नगरसेवक मदन आढाव, हेमंत लगड, बंडूनाना सप्रे आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

संबंधित घटनेची सविस्तर चौकशी करावी

संबंधित घटनेची सविस्तर चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत लक्षवेधी उपस्थित केली होती, परंतु त्याचे पुढे काय झाले, तपास झाला का, नाही झाला हे अद्याप पर्यंत समजले नाही

उद्या धनत्रयोदशी
सुवर्णखरेदीचा सुवर्णयोग..

गणपती, लक्ष्मी, रामदरबार, अन्नपुर्णा यांच्या चांदीच्या
सर्व वजनामधील भरीव व पोकळ मुर्ती व सर्व प्रकारचे देवटाक उपलब्ध.

यंदाची सुवर्णखरेदी दिवाळी धमाका ऑफर भरघोस फायद्याची..
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)

सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
शुध्दतेनुसार सोन्याचा दर 22 कॅरेट = (91.6 शुध्दता) | शुध्दतेनुसार चांदीचा दर
Conditions Apply*

चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02


2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..

शॉप विकणे
पाईपलाईन रोडटच मोरया मंगल कार्यालयासमोर ४०० स्क्वे. फुट शॉप कापडदुकानाच्या फर्निचरसहित विकणे आहे.
9028132001
9511809700

भाड्याने देणे
१२० स्क्वे. फुट गाळा आतील बाजु
अक्षता गणपतीसमोर, गुजरगल्ली
9823034435

विकणे/भाड्याने देणे
सारसनगर येथे नवीन 3BHK बंगला विकणे आहे
2BHK फ्लॅट भाड्याने आहे
9604914748

त्वरित पाहिजे
दुकानात कामासाठी कॉम्प्युटर व टॅलीचे पूर्ण अनुभव असलेला मुलगा त्वरित पाहिजे
(पुर्णवेळ स. १०.३० ते रा. १०.३०)
8669912372

WE ARE HIRING
At Ahilyangar Four-Wheeler Showroom
CRM/Telecaller
Supervisor
Sales Executive
Technician
Back Office Executive
Body Shop Executive
Ricepsnist
For Interview & More Details
HI-SKILL MANPOWER
9822613188

त्वरित पाहिजे
केडगाव व अहिल्यानगर येथे
Teacher cum Co-Ordinator
आवश्यक शैक्षणिक पात्रता B.Sc. / M.Sc. / GNM / ANM/ B.Sc. Nursing / DMLT / PGDMLT/ D.Pharm / B.Pharm / M.Pharm / B.Tech / M.Tech / BHMS/ BAMS
सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट
9823855755
9145155955

पाहिजेत
*सेल्स एक्झिक्युटिव्ह
(MBA PERFARABLE) (पुरुष -२, महिला ३)
सोबत तुमचा बायोडाटा (Resume) घेऊन या.
मुलाखतीची तारीख - ०६ व ०७ नोव्हेंबर.२०२६ वेळ - दुपारी ३ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
इन्स्पायर कॉम्प्युटर्स | तेलीखुंट, कुंदन सर्जिकलच्या जवळ, अहिल्यानगर-414001, Mo : 7483396080

दिवाळी महासेल..
स्टॉक असेपर्यंत...
महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाऊज भारी, टॉप, लोवर रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३
लेडीज : स्मॉल ते XL टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस रु.२५०/-
टू पीस 3XL ते 6xL रु.३००/-
* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे
* बेडशीट+पिलो कव्हर 100 x 100 चे ८०० चे रु.४००/- 108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
प्रत्येक रु.१००० च्या खरेदीवर एक लकी ड्रॉ कुपन..
* ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
* जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी
त्वरित पाहिजेत
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव
कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
7887395983

दर्जेदार व माफक दरात
फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?


लहान मुलांचे 1 वर्ष ते 16 वर्षा पर्यंतचे इंडो वेस्टर्ण ड्रेस, शेरवानी, जॅकेट सूट, ब्लेझर, इंपोर्टेड कार्गो पॅन्ट, अरमानी पॅन्ट, इंपोर्टेड शर्ट, कार्गो शर्ट, इंपोर्टेड टी.शर्ट अशी फॅन्सी आणि ब्रँडेड फेस्टिवल रेंज जी कुठेही पहायला मिळणार नाही आणि तेही सर्व चॅलेंज रेट मध्ये. ₹ 299 /- पासून ते ₹ 1999/- रु. पर्यंत ची भव्य रेंज.
मार्केट पेक्षा वेगळं पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या.
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

खास दिवाळी आणि भाऊबीज निमित्ताने
घरगुती व्यवसाय करणाऱ्या लाडक्या बहिणींसाठी
खास सवलत योजना तुम्ही आमच्या कडून आवडेल त्या साड्या होलसेल दरात घेऊन जा आणि न विकलेल्या साडया परत देऊन नवीन स्टॉक घेऊन जा.

सिवाराम पॅन्ट पीस शर्ट पीस जोडी 499/- रु मध्ये
रेमंड शुटिंग ₹ 299/- मीटर मध्ये
सर्व प्रकारचे फॅन्सी रेडिमेड वर 20 ते 50 % डिस्काऊंट
5 x 7 चा वेलवेट गालिचा 249/- रु मध्ये
सर्व वस्तूंची अशी रेंज जी रेग्युलर मार्केटला पहायला मिळणार नाही. आणि तेही होलसेल रेटमध्ये...
अधिक माहितीसाठी भेट द्या.
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

सर्व नागरिकांना दिपावलीच्या पाडव्याच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
ही दिवाळी सुखाची आनंदाची भरभराटीची जावो हीच ईश्वर चरणी प्रार्थना!
ज्येष्ठ समाजसेवक
मा.श्री. अविनाश देडगांवकर
(समाज रत्न पुरस्कार प्राप्त)
अहिल्यानगर


महाराष्ट्र शासन
रो.ह.यो (कार्य) विभाग अहिल्यानगर
पत्ता :- बांधकाम भवन, नगर-छ. संभाजीनगर रोड, अहिल्यानगर
egsahmednagar.ee@mahapwd.com दूरध्वनी/फॅक्स क्रमांक- ०२४१-२४२२९३८
ई-निविदा सुचना क्र. ०९ सन २०२६-२०२७
कार्यकारी अभियंता रो.ह.यो (कार्य) विभाग अहिल्यानगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खाली नमुद केलेल्या कामासाठी निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेवू शकेल. खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता रो.ह.यो (कार्य) विभाग अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित किंमत (रु. लाखात)	नोंदणी वर्ग
१	श्री तुळजाभवानी माता व हनुमान मंदिर संस्थान खामगाव येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर (दुबार निविदा)	२०.५०	सुशिक्षित बेरोजगार अभियंता
२	श्री विठ्ठल रुक्मिणी अध्यात्मिक केंद्र गोणेगाव (चौफुला) येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता.नेवासा, जि अहिल्यानगर (दुबार निविदा)	२१.००	सुशिक्षित बेरोजगार अभियंता
३	श्री हनुमान मंदिर देवस्थान संस्थान वेलपिंपळगाव येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर (दुबार निविदा)	२१.००	सुशिक्षित बेरोजगार अभियंता

ई-निविदा उपलब्ध कालावधी	:-	दिनांक ०५/११/२०२६ ते दिनांक १२/११/२०२६
निविदापुर्व बैठक	:-	निरंक
ई-निविदा उघडणे	:-	दिनांक १३/११/२०२६

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. www.mahapwd.com
२. mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३.कार्यकारी अभियंता रो.ह.यो.(कार्य) विभाग अहिल्यानगर कार्यालयातील सूचना फलक
जा. क्र. लेखा/निविदा/४६४४/सन २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
रो.ह.यो.(कार्य) विभाग, अहिल्यानगर, दिनांक २९/१०/२०२६
कार्यकारी अभियंता
रो.ह.यो. (कार्य). विभाग, अहिल्यानगर


चौथे पुण्यस्मरण
आपल्या संस्काररूपी स्मृतींचा.. स्मृतीगंध आजही दरवळत आहे.. प्रत्येक क्षणोक्षणी आपणच आम्हांला प्रेरणा देत आहे..
कै.बन्सी विश्वनाथ कोतकर
(स्व.०५/११/२०२२)
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
: शोकाकूल :
मधुकर बन्सी कोतकर
श्रेया गार्डन, केडगाव, अहिल्यानगर
समस्त कोतकर परिवार

अक्षय मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध!
* अत्याधुनिक मोतीबिंदू (Phaco) शस्त्रक्रिया * चष्मा काढण्यासाठी लेसर उपचार (LASIK)
* केरॅटोकोनससाठी C3R उपचार कॉर्निया प्रत्यारोपण (Corneal Transplant)
* कॉर्नियावरील जखम व संसर्गाचे उपचार * प्टेरिजियम (डोळ्यावरील मास) शस्त्रक्रिया

* काचबिंदू (Glaucoma) तपासणी व उपचार
* रेटिना इंजेक्शन उपचार * तिरळेपणा शस्त्रक्रिया
* संगणकीकृत नेत्र तपासणी व चष्म्याचा नंबर
सर्व प्रकारच्या डोळ्यांच्या आजारांवर आधुनिक व तज्ञ उपचार
या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर
डॉ.सौ.नलिनी गिते (महिंद्रकर) नेत्र व कॉर्निया तज्ञ / मोतीबिंदू तज्ञ MBBS, MS (Ophthalmology) FGO, FCRS (H.V. Desai Eye Hospital, Pune)
अक्षय मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व प्रसुतिगृह
गीते हॉस्पिटल, बालिकाश्रम रोड,अहिल्यानगर Mo : 9257575714



अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर

महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर
कार्यालय फोन नंबर २३२६९१४ Email.id-ahmednagarfederation@gmail.com
जा. क्र. पतसंस्था/फेडरेशन ९६९/२०२६ दिनांक- १३/०८/२०२६

स्थावर मालमत्ता तारण घेण्याबाबतची नोटीस

नमुना 'झेड'
(नियम १०७पोट-नियम (११(ड-१)पहा.)

ज्याअर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी :-पंडित दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या, आनंदीबाजार, ता. जि. अ.नगर व्दारा: अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या,अ-नगर , महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासुन आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे. खाली सही करणाऱ्याने जप्तीची नोटीस दिली असुन पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला याव्दारे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेच्या खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि.१२/०८/२०२६ दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास :- पंडित दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था, मर्या., आनंदीबाजार, ता. जि. अ. नगर यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

अ. नं.	कर्जदाराचे नाव	थकबाकीची रक्कम	नोटिस दिनांक	गावाचे नाव	गट क्रमांक भुमापन क्र.	क्षेत्र हे. आर चौ.मी	चतुःसीमा पुर्व	पश्चिम	दक्षिण	उत्तर
१	कर्जदार- प्रविण हिंमतलाल कटारिया यांची मिळकत व करिता	दावा रक्कम रु. ५५४८६०१/- दि.०१/१२/२०२२ पासुन १३ टक्के व्याज+इतर खर्च	मागणी नो. दि. २९/१२/२०२५ जाही नो. दि. ०४/०५/२०२६	मोरचुदनगर चाहुराना बु. ता. नगर	२३/२/७४/१/७४/२ प्लॉट २ पैकी	०.२७ ३.३४पैकी	मुळ नकाशाप्रमाणे			
२	कर्जदार - सतिश हिंमतलाल कटारिया यांची मिळकत	दावा रक्कम५४,६२,६४०/- दि.०१/१२/२०२२ पासुन १३ टक्के व्याज+ इतर खर्च	मागणी नो. दि. २९/१२/२०२५ जाही नो. दि. ०४/०५/२०२६	मोरचुदनगर ता. नगर	२३/२	०.६८.००	मुळ नकाशाप्रमाणे			

(सही)
एम. ए. शेख
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या., अ. नगर

दिनांक- १३/०८/२०२६
स्थळ- अ. नगर

शुद्धतेची परंपरा, सणांचा खरा आनंद.
धनत्रयोदशी व दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
खास दिवाळीसाठी नमकिन व मिठाई
चावंडा केटर्स
चावंडा स्पेशल लवंग शेव, मोहन थाळ, काजु गजक, ड्रायफ्रुट कसाटा
प्रोप्रा. मुरली महाराज : 9823030554 | रवि उपाध्ये : 8412902554
चावंडा सदन, अभिनव रेसिडेन्सी, विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

बुकिंग सुरु
Serenity
या दिवाळीला करा स्वप्नातील घराचे स्वप्न साकार!
या दिवाळीच्या शुभमुहूर्तावर बुक करा आपल्या हक्काचं नवं घर
अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज
टेरेस गार्डन
आधुनिक बांधकाम
सुसज्ज पार्किंग सुविधा
अत्याधुनिक डिजिटल सुरक्षा प्रणाली
प्राईम लोकेशन प्रीमियम फ्लॅट्स
3BHK LUXURIOUS APARTMENT
PROJECT BY - VASUDHA GROUP
कवीजंग नगर, युनियन बँकेजवळ, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर
9730969093 | 9860182219

या दिवाळीला संकल्प नव्या घराचा, आनंद सुखी संसाराचा!
Pristine
बुकिंग सुरु
या दिवाळीच्या शुभमुहूर्तावर बुक करा आपल्या हक्काचं नवं घर
अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज
टेरेस गार्डन
आधुनिक बांधकाम
सुसज्ज पार्किंग सुविधा
अत्याधुनिक डिजिटल सुरक्षा प्रणाली
3BHK LUXURIOUS APARTMENT
रेडी पझेशन
प्राईम लोकेशन प्रीमियम फ्लॅट्स
PROJECT BY - VASUDHA GROUP
डुंगरवाल हॉस्पिटल शेजारी, सावेडी नाका, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9881883993 | 9860182219 | 9730969093

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : 23 ते 29 ऑक्टोबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
SCREEN - 1
दशमी 03:00 PM 150/-
गांव थी गावकी.. 12:00 Noon 150/-
प्रहार (हिंदी) 09:00 PM 150/-
सोहळा 06:00 PM 150/-
SCREEN - 2
रजनी : द जेलर २ (हिंदी) 12:00 Noon 150/- 09:00 150/-
'दृश्यम ३' 03:00 150/-
कापूसकोंडा (मराठी) 06:00 PM 150/-
आशा रक्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 30 ते 05 नोव्हेंबर 2026
रामायण ३ डी (हिंदी)
07:00 AM 06:15 PM
10:45 AM 10:00 PM
02:30 PM
रामायण २ डी (हिंदी)
08:00 AM 08:45 AM
11:45 AM 12:30 PM
03:30 PM 04:15 PM
07:15 PM 08:00 PM
11:00 PM 11:35 PM
10:00 AM 01:45 PM
05:30 PM 09:15 PM
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

ॲडव्हान्स बुकिंग सुरू
MY CINEMA
AHILYANAGAR'S 1ST 5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow
Show - 5/11/2026 to 8/11/2026
RAMAYANA (2D) - 7:30, 8:00, 8:45, 11:00, 11:30 am, 12:15, 2:30, 3:00, 3:45, 6:00, 6:30, 7:15, 9:30, 10:00, 10:45 pm,
RAMAYANA (3D) - 8:30 pm, 12:00, 3:30, 7:00, 10:30 pm.
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.



फॅशनचा साज, दिवाळीचा थाट
दिवाळीनिमित्त खास ऑफर
10% FLAT DISCOUNT ₹3000 पेक्षा जास्त खरेदीवर
आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा खास सरप्राईज गिफ्ट!
'धनत्रयोदशी' या शुभमुहूर्तावर ५० वा वर्धापन दिन साजरा करताना आनंद होत आहे. आपला स्नेह व सहकार्यामुळेच आम्ही या यशशिखरावर पोहोचलो आहोत, त्याबद्दल आपले मन:पुर्वक आभार! दीपावलीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!
since 1976 शांतिदूत ड्रे से स
एम.जी. रोड, अहिल्यानगर | Mo.: 9112234115
संबंधीत फर्मस्
अक्षता सारीज् नवीपेठ, अ.नगर | Mo.: 8329568890
मे. सुभाषचंद्र हेमराज पोखरणा नवीपेठ, अ.नगर | Mo.: 9822284141
Avinash D Shirapuri - 9607337529

१९१० पासून
CRD
दिवाळीच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा!
मे. चिंतामण रामचंद्र देशमुख
ॲन्ड सन्स सराफ
सुवर्णसेवा पिढ्यांपिढ्यांची
नात्यांचे सोनेरी बंध आणि समृद्धीचा सण
ज्योतिर्मय दिवाळी
जुन्या सोन्याच्या एक्सचेंज व्हॅल्यूवर मिळवा (प्रति 10 ग्रॅम) (EXCHANGE BONUS) ₹1,000 अतिरिक्त फायदा*
१८ व २२ कॅरेट सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर मिळवा 5 ते 25% पर्यंत सूट*
ऑफर १८ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मर्यादित! | *नियम व अटी लागू
crdjewellers.com
या दिवाळीत खरेदी करा आणि मिळवा खास शॉपिंग व्हाउचर!
*नियम आणि अटी लागू. ऑफर मर्यादित कालावधीसाठी
दिवाळीच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा!
गंज बाजार, अ.नगर 8432106255
सोनानगर चौक, सावेडी, अ.नगर 7276498006
१९५ वर्षांचा विश्वास आणि परंपरा • अक्षय सुवर्ण बचत योजना • अद्वितीय डिझाईन्स • सर्वात कमी घडणावळ • हॉल मार्क प्रमाणित दागिन्यांच्या एक्सचेंजवर ०% कपात